तातडीचे

क्रमांक : पोमसं/१६/३६९९/कवृंप-५१ वी सभा/४८/२०१६, मुंबई, दि.२६ /०६/२०१९.

विषय :- राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद - ५१ वी सभा.

****

राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची - ५१ वी सभा सोमवार, दि.१७/०६/२०१९ रोजी सकाळी ११:३० वाजता महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये ५० व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमधील २७ मुद्यांची आढावा, ५१ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी उपस्थित केलेले ३७ मुद्दे, तसेच आयत्यावेळी उपस्थित करण्यात आलेले ११ मुद्दे, अशा एकूण ७५ मुद्यावर चर्चा करण्यात आली. त्याबाबतचा कार्यवृत्तांत माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी यासोबत पाठविण्यात येत आहे. त्यामध्ये अध्यक्षांनी दिलेल्या निर्देशानुसार सर्व संबंधीतांनी आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२. घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, सदर कार्यवृत्तांत सर्व पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यासाठी मुख्यालयाच्या व पोलीस ठाण्यांच्या सूचना फलकांवर लावण्यात यावा. त्याचबरोबर, ह्या सभेमध्ये घेण्यात आलेले निर्णय घटकांच्या पोलीस राजपत्रांमध्ये प्रसिध्द करावेत. तसेच, ह्या कार्यवृत्तांताच्या प्रती त्यांच्या आस्थापनेवरील सदस्यांना देवून, त्याबाबत त्यांचे काही म्हणणे **(say / opinions)** असल्यास, ते एक महिन्याच्या आंत या कार्यालयास कळविण्याविषयी व या मुदतीत त्यांचे म्हणणे या कार्यालयास प्राप्त झाले नाही, तर सदर कार्यवृत्तांत त्यांना मान्य असल्याचे गृहित धरले जाईल, असेही कृपया त्यांना सूचित करावे.

(कृष्ण प्रकाश)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई **(सस्नेह)**
महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई **(सस्नेह)**
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग / वाहतूक / रा.रा.पो.बल / प्रशिक्षण व खास पथके / दहशतवाद विरोधी पथक /आर्थिक गुन्हे शाखा / फोर्स वन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, बिनतारी संदेश विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.

विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर गुन्हे / ना.ह.सं. / महिला अत्याचार प्रतिबंधक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, मो.प.वि., महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅम्प नागपूर
पोलीस उप महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्ग / मोटार परिवहन विभाग / बिनतारी संदेश / विशेष कृती, नागपूर / शस्त्र निरीक्षण शाखा, पुणे सह)
सर्व समादेशक, रा रा पो बल गटं, क्र. १ ते १६
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालयें.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रकटिकरण केंद्र, नाशिक.
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व सभासद.

प्रत माहितीसाठी :-

अपर पोलीस महासंचालक, का. व सु., / विशेष कृती / आस्थापना / नि. व स. / धोरण / प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, (का. व सु.) / (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नि. व स.) / (का. व सु.) / (प्रशासन), (धोरण) (आस्थापना), महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहायक पोलीस महानिरीक्षक तथा सर संपादक (दक्षता), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस अधीक्षक, राज्य नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे विधी सल्लागार, विधी अधिकारी.
सर्व वरिष्ठ उप सहायक / उप सहायक.
पोलीस महासंचालक यांचे वरिष्ठ स्वीय सहायक

प्रत :-

सर्व कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. १ ते ४४
कार्यालय अधीक्षक, प्रशिक्षण व खास पथकें / रा.रा.पो.बल. / लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२/- त्यांनी कार्यवृत्तांतातील त्यांच्या कार्यासनाशी संबंधीत ज्या मुद्यांवर कार्यवाही करणे आवश्यक आहे, ती कार्यवाही संबंधीत वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मान्यतेने विनाविलंब करावी, व त्यासंबंधीचा पुर्तता अहवाल / अभिप्राय त्वरित कार्यासन क्र. १६ कडे पाठवावेत.

प्रत :-

विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), यांचे स्वीय सहायक.

५१ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेची सभा सोमवार, दि.१७/०६/२०१९ रोजी सकाळी ११:३० वाजता महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, मुंबई येथे घेण्यात आली. सदर सभेमध्ये खालील पोलीस / अधिकारी व कर्मचारी / मंत्रालयीन अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते :-

अ.क्र.	नांव	पदनाम	घटक	सभासद
१	श्री. सु. कु. जायसवाल	पोलीस महासंचालक	महाराष्ट्र राज्य, मुंबई	पद्सिध्द अध्यक्ष
२	श्री. संजीव कुमार सिंघल	अपर पो.म.सं. (प्रशासन)	महाराष्ट्र राज्य, मुंबई	पद्सिध्द उपाध्यक्ष
३	श्री. एस्. जगन्नाथन	अपर पो.म.सं (नि. व स.)	महाराष्ट्र राज्य, मुंबई	पद्सिध्द सदस्य
४	श्री. मिलिंद भारंबे	वि.पो.म.नि. (प्रशासन)	महाराष्ट्र राज्य, मुंबई	पद्सिध्द सचिव
५	श्रीमती एन्. अंबिका	पो. उप आ., मुख्यालय-२	बृहन्मुंबई	सभासद
६	श्रीमती सनिका उमेश गोडांबे	मपोशि/०६-०३११	बृहन्मुंबई	सभासद
७	श्री. तानाजी पांडुरंग पाटील	पोलीस शिपाई	ठाणे शहर	सभासद
८	श्री. राजेंद्र बापूराव जगताप	स.पो.उप नि.	पुणे शहर	सभासद
९	श्री. विठ्ठल खंडुजी कुबडे	वरिष्ठ पोलीस निरीक्षक	पिंपरी, चिंचवड	सभासद
१०	श्री. ताहीर हुसेन	पोना/१७११	नागपूर शहर	सभासद
११	श्री. अमोल निवृत्ती गागरे	पोशि/१२१६०	नवी मुंबई	सभासद
१२	श्री. सर्जेराव शंकर पाटील	पोना/११७४	सोलापूर शहर	सभासद
१३	श्री. दिक्षीतकुमार अशोक गेडाम	पोलीस अधीक्षक	सिंधुदुर्ग	सभासद
१४	श्री. महिपालसिंग नथ्थुसिंग चांदा	पोलीस उप अधीक्षक	गोंदिया	सभासद
१५	श्रीमती धानुबाई बळीराम कटरे	मपोहवा/१३१	भंडारा	सभासद
१६	श्री. बी. डी. फुंदे	पोलीस निरीक्षक	औरंगाबाद ग्रामीण	सभासद
१७	श्री. प्रशांत देविदास गिते	सहायक पोलीस निरीक्षक	यवतमाळ	सभासद
१८	श्री. अनिल उत्तम काळे	पोहवा/१५५८	पुणे ग्रामीण	सभासद
१९	श्री. वामन सखराम कोकाटे	पोहवा/१८६८	नांदेड	सभासद
२०	श्री. नितीन मोतीराम उन्हवणे	पोलीस निरीक्षक	दहशतवाद विरोधी पथक, मुंबई	सभासद
२१	श्रीमती स्मिता वाल्मीक ढाकणे	पोलीस निरीक्षक	लोहमार्ग, मुंबई	सभासद
२२	श्री. ए. एस्. कांबळे	पोना/११३९	लोहमार्ग, पुणे	सभासद
२३	श्री. एस्.एस्. डोईफोडे	पोलीस उप निरीक्षक	पो.उ.अधी., चालक प्र. केंद्र, पुणे (मो.प.विभाग)	सभासद
२४	श्री. अजित शामराव खरात	पोलीस उप निरीक्षक	बि.सं., अभियांत्रिकी मुंबई शहर	सभासद
२५	श्री. पी. पी. खडपकर	राखीव पो. उप नि.	रारापोबल, गट क्र.१, पुणे	सभासद
२६	श्री. एस्. के. देशमुख	पोहवा/१६४	रारापोबल, गट क्र.५, दौंड	सभासद
२७	श्री. एस. एम. कनोजिया	पोहवा/२५	रारापोबल, गट क्र. ४, नागपूर	सभासद
२८	श्री. विद्याधर जयसिंग घोरपडे	पोलीस उप निरीक्षक	पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ	सभासद
२९	श्री. उमेश लोणारे	पोहवा/१५९	पो. प्रशि. केंद्र, नागपूर	सभासद
३०	श्री. दिपक दुर्योधन राणे	पोहवा/४३४०	फोर्स वन, मुंबई	सभासद

अ.क्र.	नांव	पदनाम	घटक	सभासद
३१	श्री. गणेश काकड	पोशि	महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक	सभासद
३२	श्रीमती रश्मी शुक्ला	आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
३३	श्री. रजनीश शेठ	अपर पो.म.सं. (का. व सु.)	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
३४	श्री. राजेंन्द्र सिंह	अपर पो.म.सं. (विशेष कृती)	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
३५	श्री. जय जीत सिंह	अपर पो.म.सं. (लोहमार्ग)	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
३६	श्री. एस्. जगननाथन	अपर पो.म.सं. (नि. व स.)	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
३७	श्रीमती अर्चना त्यागी	अपर पो.म.सं. रा.रा.पो.बल	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
३८	श्री. संजय सेक्सना	अपर पो.म.सं., प्रशिक्षण व खास पथके	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
३९	श्री. नवल बजाज	सह पोलीस आयुक्त, प्रशासन	बृहन्मुंबई	
४०	श्री. राजेश प्रधान	विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४१	श्री. सुधीर हिरेमठ	सहायक पोलीस महानिरीक्षक, नि. व स.	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४२	श्री. विनायक देशमुख	सहायक पोलीस महानिरीक्षक, का. व सु.	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४३	श्री. विजय खरात	सहायक पोलीस महानिरीक्षक, प्रशासन	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४४	श्री. लॅन्सी कोयलो	वरि.उप सहा., निवृत्ती वेतन	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४५	श्री. अरविंद जाधव	उप सहायक, पुनर्रचना	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४६	श्री. राजीव चावडे	उप सहायक, वि.चौ	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४७	श्री. मिलींद मांजरेकर	उप सहायक, गोपनीय	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४८	श्रीमती नम्रता लब्दे	कार्यासन अधिकारी, का.क्र.१६	महाराष्ट्र राज्य, मुंबई	
४९	सर्व कार्यासन अधिकारी, पोमसं कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई			
५०	श्री. अमोल खोंडे	पोलीस उप निरीक्षक	नाशिक शहर	
५१	श्री. अनिल सुरेशराव देवरणकर	पोलीस शिपाई / ४७५	अमरावती शहर	

सदर बैठकीचे कार्यवृत्तांत खालीलप्रमाणे आहे :-

५१ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या सभेसाठी सर्व उपस्थितांचे मा. अध्यक्ष यांच्या वतीने पद्सिध्द सचिव, तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी स्वागत केले. त्यानंतर पद्सिध्द सचिवांनी मा. अध्यक्ष यांना ५१ व्या सभेकरीता सुरुवात करण्याची अनुमती घेऊन सभेकरीता उपस्थित केलेल्या मुद्दे वाचण्याकामी सहायक पोलीस महानिरीक्षक, प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना आमंत्रित केले. त्यानंतर त्यांनी ५० व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीतील कार्यवाही करावयाचे प्रलंबित मुद्दे व ५१ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये चर्चेकरीता उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांवर चर्चा सुरु केली.

सदर सभेमध्ये ५० व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या २७ मुद्दे, ५१ व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेसाठी उपस्थित केलेले ३७ मुद्दे, तसेच आयत्यावेळी उपस्थित करण्यात आलेले ११ मुद्दे, अशा एकूण ७५ मुद्यांवर चर्चा करण्यात आली. मा. अध्यक्षांनी त्यापैकी ४५ मुद्दे निकाली काढले. उर्वरित ३० मुद्यांवर मा. अध्यक्षांनी कार्यवाहीचे आदेश / निर्देश दिलेले आहेत.

तसेच मा. अध्यक्षांनी निर्देश दिले की, सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी यापुढे बैठकीसाठी येताना विषयाचा पुर्ण अभ्यास करुन परिपूर्ण माहितीसह उपस्थित रहावे. कामाप्रती व्यावसायिक दृष्टीकोन असावा. तपास / कायदा व सुव्यवस्था या कामकाजामध्ये आणखी सुधारणा करण्यात यावी. पोलीस अधिकारी-कर्मचारी व मंत्रालयीन अधिकारी-कर्मचारी यांनी अपले कर्तव्य चोखपणे बजवावेत व त्यासाठी कोणाकडूनही कोणत्याही स्वरुपाची बेकायदेशीर मागणी करु नये. त्यानंतर अध्यक्षांनी सर्वांना धन्यवाद दिले, व मा. अध्यक्षांच्या वतीने पद्सिध्द सचिव, तथा विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी ५१ वी राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषद संपन्न झाली, असे जाहीर केले.

******

५०व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांवर झालेली कार्यवाही

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१.	श्री. सुबराव लाड, पो.उप नि.,पुणे शहर **का.क्र. १**	सिनेमामध्ये पोलीसांची चुकीची प्रतिमा दाखवत असल्याने सिनेमा व मालिकांच्या सेन्सॉर बोर्डावर पोलीस अधिकाऱ्याची नेमणुक व्हावी	वि. पो. म. नि. (आस्थापना), यांनी योग्य ती कार्यवाही करावी.	सेन्सॉर बोर्डाकडे प्रस्ताव पाठविण्याबाबत शासनास शिफारस करण्यात आली आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
२.	श्री. सुबराव लाड, पो.उप नि.,पुणे शहर **का.क्र. १**	सन २०१५ पुर्वीच्या विविध पदक / सन्मान चिन्ह प्राप्त पोलीस अधि./कर्म. यांनाही मा. पोलीस महासंचालकांचे ओळखपत्र मिळावे.	ओळखपत्र देण्याबाबतची कार्यवाही वि. पो. म. नि. (आस्थापना),, यांनी करावी.	कार्यवाही सुरु असून ३८३ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना मा. पोलीस महासंचालक यांचे ओळखपत्र प्रदान करण्यात आलेले आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
३.	श्री. चंद्रकिशोर मीणा, समादेशक, गट क्र.११ (तत्कालिन अकोला) **का.क्र. ३०**	सेवानिवृत्ती नंतर साक्षकामी न्यायालयात हजर राहण्याकरिता बस/रेल्वे वॉरंन्ट पुरवावेत.	TA / DA ची शासन निर्णयातील तरतूद सर्व घटक प्रमुखांच्या निदर्शनास आणून देण्याचे वि.पो.म.नि. (प्रशासन), यांना निर्देश दिले.	शासन अधिसुचना सर्व घटक प्रमुखांना कळविण्यात आलेले आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
४.	श्री. पंकज पांडे, पो.हवा. क्र.९५५, गोंदिया **का.क्र. ३०**	कार्यालयीन कामात पोलीस कर्मचारी हे स्वत:चे वैयक्तिक मोबाईलवरुन शासकीय कामे पार पाडत असल्याने, त्यांना मोबाईल भत्ता मिळणेबाबत	तात्काळ सेवा म्हणून पो. कर्म.ना मोबाईल भत्ता मिळण्याकरीता शासनास प्रस्ताव पाठवावा.	सदर मागणीबाबत शासनास प्रस्ताव सादर केलेला आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	अध्यक्षांचे आदेश / निर्देश
५.	श्री. पंकज पांडे, पो.हवा. क्र.९५५/ गोंदिया श्री. कमलकांत सिंह, पो.नि., गट १२, हिंगोली **का.क्र. ३०**	प्रवासभत्ता रु.२००/- प्रमाणे होण्याबाबत प्रवास भत्त्यामध्ये वाढ झ ाल्यास कर्मचारी हे खूशीने गट मुख्यालयाबाहेरील कर्तव्य बजावतील.	शासनास प्रस्ताव पाठविण्याचे निर्देश दिले.	शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
६.	श्री. संजय जाधव, पोलीस अधीक्षक, नांदेड **का.क्र. ३०**	प्रवास भत्याचे दर वाढविणे आवश्यक आहे.	प्रवास भत्त्यामध्ये वाढ होण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठवावा.	शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
७.	श्री. संजय जाधव, पोलीस अधीक्षक, नांदेड **का.क्र. ९**	उत्कृष्ट व निष्कलंक सेवा पार पाडलेल्या पोलीस अधि./कर्म. यांना आगाऊ वेतनवाढ मंजूर करावी.	शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत निर्देश दिले.	शासनास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
८.	श्री. सुरेश माटे, समादेशक, गट क्र. १४ श्री. दिलीप झळके, पो.अधी., अमरावती ग्रामीण **का.क्र. ३०**	राज्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना रेल्वेमध्ये तात्काळ रिझर्व्हेशन तसेच बसेस / शिवनेरी बसेसमध्ये रिझर्व्हेशन मिळणेबाबत.	ज्या सुविधा MSRTC कडून प्राप्त होऊ शकतात. त्या प्राप्त करण्यासाठी पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.	राज्य परिवहन महामंडळ यांना सूचना देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
९.	श्री. सुरेश माटे, समादेशक, गट क्र. १४ **अ.पो.म.सं., रा.रा.पो. बल**	रा. रा. पोलीस दलातील पोलीस अधि. व कर्म.यांचे आंतर सुरक्षा बंदोबस्तादरम्यान साप्ताहीक सुट्टी बंद करण्याची परवानगी मिळणेबाबत	सदर मुद्याच्या अनुषंगाने अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, मुंबई यांनी मार्गदर्शनपर परिपत्रक निर्गमीत करावे.	सदर प्रकरणी अ.पो.म.सं., रारापोबल यांनी उचित दिशा निर्देश संबंधीत समादेशक यांना देण्यात आलेले असून योग्य ती कार्यवाही करणेबाबत कळविण्यात आले आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१०.	श्री. दिलीप झळके, पो.अधी., अमरावती ग्रामीण **का.क्र. २८-अ**	पोलीस अधि./कर्म. यांचे प्रलंबित असलेले अपघात विमा दावे ओरीएन्टल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, पुणे यांनी लवकरात लवकर मंजुर करावे.	अपघात विम्याचा दावा मिळण्यासंदर्भात / तसेच त्याबाबतचा फॉर्म मराठीत असावा, याकरीता ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीकडे पाठपुरावा करावा.	प्रलंबित दाव्यांची कागदपत्रे विमा कंपनीस देण्यात आली असून, दावे तात्काळ निकाली काढण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तसेच समूह व्यक्तीगत अपघात विमा योजनेचा मराठी भाषेतील दावा फॉर्म विमा कंपनीस पाठविण्याबाबत सर्व घटक प्रमुखांना सुचना देण्यात आल्या आहेत.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
११.	श्री. धीरज पाटील, अपर पो.अधी., सातारा **का.क्र. ९**	DG Insignia प्राप्त पोलीस अधि./कर्म. यांना १ वाढीव वेतनवाढ व ५० हजार किंवा त्यावरील रोख स्वरुपात रक्कमेचे रिवॉर्ड देण्यात यावे.	शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत यांना निर्देश दिले.	शासनास प्रस्तावित करण्यात आले आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
१२.	डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, चंद्रपूर **का.क्र. ३०**	पोलीस अधिकारी यांना गणवेष भत्ता चार वर्षांनी एक वेळा रु.५,०००/- मिळतो तो दरवर्षी रु.८,०००/- प्रमाणे देण्यात यावा.	शासनाकडे पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.	शासनास प्रस्ताव सादर केला आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
१३.	श्री. अब्दुल पापामिया शेख, पो.उप नि. , बि.संद.वि., (कल्याण विभाग), ठाणे शहर **का.क्र. ५अ**	आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत जे वेतन घेतात त्यांना आहार भत्ता मिळावा.	विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), मुंबई यांना सदर मुद्दा तपासण्याबाबत निर्देश दिले.	आश्वासित प्रगती योजना लागु झालेल्या कर्मचाऱ्यांना वरिष्ठ पदाचे वेतन व भत्ते अदा करण्यात येतात. त्यामुळे पूर्वीच्या पदाचा आहार भत्ता देय नाही.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१४.	श्री. अनिल जगधन, सपो.उप नि. गट ३ जालना **का.क्र. ६**	पोलीस नाईक ते सहायक पोलीस उप निरीक्षक यांना पदोन्नती वेळेत मिळावी.	पदोन्नती देण्याबाबतची कार्यवाही वेळेतच पुर्ण करावी.	अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई यांनी सर्व समादेशकांना सुचना दिलेल्या आहेत.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
१५.	श्री. रविंद्र पांडूरंग साकरकर, पोशि नांदेड **पोलीस अधीक्षक, नांदेड**	नांदेड जिल्ह्यातील पोलीस अधि./कर्म.यांचे निवास-स्थानांमध्ये घाणीचे साम्राज्य आहे. त्यामधील ड्रेनेजची दूरावस्था झाली असून आजुबाजुला गवत वाढलेले आहे. सदर निवासस्थानांची देखभाल राखली जात नाही.	पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी ज्यांच्या अधिपत्त्याखाली निवासस्थाने आहेत. त्यांचेशी पत्रव्यवहार / चर्चा करुन योग्य ती कार्यवाही करावी.	नवीन ड्रेनेज पाईपचे ८० टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच वेळोवेळी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेकडून स्वच्छता अभियानांतर्गत वसाहतीची स्वच्छता करण्यात येत आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
१६.	श्री. धीरज पाटील, अपर पो.अधी., सातारा **संगणक कक्ष**	Gov.in या बेबसाईटमध्ये सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचे ई-मेल आयडी तयार करण्याबाबत.	अपर पोलीस महासंचालक (धोरण), मुंबई यांना कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.	१५००० ई-मेल ची क्षमता निश्चित करण्यात आलेली आहे. त्यापैकी सुमारे ११३०४ ई-मेल आयडी बनविण्यात आले असून ३६९६ ई-मेल आयडीची क्षमता शिल्लक आहे. साधारणत: १ लाख पोलीस कर्मचारी ह्यांची gmail किंवा इतर E-Mail address उपलब्ध आहे. त्यामुळे जर Gov.in वरचे E-mail नसेल तरी, आधानप्रदान / पत्रव्यवहार (communicate) करता येते.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

५०व्या राज्य स्तरीय पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीमध्ये उपस्थित केलेल्या मुद्यांवर सुरु असलेली कार्यवाही

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१.	श्री. विवेक मुगळीकर, व.पो.नि, पुणे शहर श्री. एम. जी. सावंत, पो.उप नि., रारापोबल प्रशिक्षण केंद्र नानवीज **का.क्र. २७**	पोलीस अधि./कर्म. यांच्या पाल्यांसाठी केंद्रीय पोलीस कल्याण निधीतून अथवा प्रायोजकातर्फे निवासी होस्टेल नाममात्र भाडे आकारुन उपलब्ध करुन द्यावे.	अ.पो.म.सं. (नि. व स.), यांनी नागपूर प्रमाणे पोलीस अधि./कर्म.यांच्या पाल्यांसाठी निवासी होस्टेल नाममात्र भाडे आकारुन उपलब्ध करावेत.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई /पुणे शहर / औरंगाबाद शहर, पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण / औरंगाबाद ग्रामीण यांचेकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे शहर / औरंगाबाद शहर / पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी निवासी होस्टेल बांधावे. ह्यासाठी अपर पोमसं, धोरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / पुणे शहर / औरंगाबाद शहर यांचेकडून दि.२१/६/२०१९ पर्यंत प्रस्ताव प्राप्त करावे. सदर प्रकरणी दि.३१ मार्च, २०२० पर्यंत केंद्रीय पोलीस कल्याण निधीतून निवासी होस्टेल नाममात्र भाडे आकारुन मुंबई / पुणे / औरंगाबाद येथे उपलब्ध करुन देण्यात यावेत.

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२.	श्री. विजय पवार, अ. पो.अधी., सातारा **का.क्र. ३०**	शहरातील एस.टी. महामंडळाच्या सीटी बसेस पोलीसांकरीता विना शुल्क असावीत. (पुणे, मुंबई, सोलापूर, ठाणे इ. शहराप्रमाणे)	विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), यांनी पाठपुरावा करावा.	पोलीस अधीक्षक, सातारा यांना दि.३०/४/२०१९ च्या ज्ञापान्वये कळविलेले आहे. त्यांचेकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.	सातारा जिल्ह्यामध्ये सीटी बसेस नसल्यामुळे मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला
३.	श्री. चंद्र किशोर मीणा, समादेशक, गट क्र.११ (तत्कालिन अकोला) **पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई**	पोलीस कर्मचारी हे मुंबई व पुणे येथे तपासकामी किंवा टपाल ड्युटीकामी गेल्यास तेथे राहण्यासाठी पोलीस क्लबची निर्मीती करण्यात यावी.	पोलीस क्लबसाठी जागेची उपलब्धता तपासून कार्यवाही करण्याबाबत सह पोलीस आयुक्त, प्रशासन, बृहन्मुंबई यांना निर्देश दिले.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडून कार्यवाही अहवाल अप्राप्त आहे.	सह पोलीस आयुक्त, प्रशासन, बृहन्मुंबई यांनी आझाद मैदान येथे १५ पोलीस कर्मचारी राहू शकतील अशी निवास व्यवस्था तयार असून ४-५ दिवसांत वापराकरीता उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. चर्चेअंती मुद्दा निकाली काढण्यात आला.
४.	श्री. एल. एस. उत्तेकर, उप प्राचार्य, रारापो बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज. **व.उ.स.आस्था.-१ का.क्र. २**	सहायक समादेशक व समादेशक सहायक यांना १५ दिवस अतिरिक्त रजा मंजूर करण्यांबाबत शासन लिखाण होणेस विनंती आहे.	वि. पो. म. नि. (आस्थापना), यांनी राज्य राखीव पोलीस बल प्रशिक्षण केंद्र, नानवीज यांचे कडुन प्रस्ताव मागवून त्याप्रमाणे कार्यवाही करावी.	सहायक समादेशक व समादेशक सहायक यांना शासनाच्या दुसरा व चौथा (शनिवार), सर्व शासकीय सुट्ट्या अनुज्ञेय आहेत. त्यामुळे त्यांना १५ दिवस अतिरीक्त रजा मंजुर करता येणार नाही.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
५.	मपोहवा/३०८७ आशा खंडू पाटील, ठाणे शहर **का.क्र. २७**	पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांसाठी ठाणे शहर येथे असलेल्या राखीव जागेमध्ये पोलीसांकरीता रहाण्याकरीता वसाहत, किंवा इतर योजना राबविणे आवश्यक आहे.	पोलीस गृहनिर्माण यांचेकडे पाठपुरावा करण्याबाबत अपर पोलीस महासंचालक (साधनसामुग्री व तरतूद), यांना सांगितले.	नवीन पोलीस वसाहत इमारत/नवीन शासकीय निवासस्थाने बांधण्याकरीता आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ यांना विनंती करण्यात आली आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
६.	मपोना/२१७३ वाय.एस. कांबळे, नेम. मुंबई रेल्वे **अ.पो.म.सं., लोहमार्ग, मुंबई**	रेल्वे पोलीस कर्मचाऱ्यांना रेल्वे फ्री पास उपलब्ध व्हावेत.	रेल्वे प्रशासनाकडे आदेश प्रलंबित आहेत. याबाबत अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग, मुंबई यांनी पाठपुरावा करावा.	**अपर पोलीस महासंचालक, लोहमार्ग व पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई** या कार्यालयातुन पाठपुरावा करण्यात येत आहे.	सदर मागणी पूर्ण करणे शक्य नसल्याने, मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
७.	श्री. कमलकांत सिंह, पो.नि., गट क्र.१२, हिंगोली **अपर पोलीस महासंचालक, रा.रा.पो.बल, मुंबई**	रा. रा. पो. दलातील अधि.व कर्म. यांचे आर्थिक वर्षातील शिल्लक साप्ताहिक सुट्टीचे देयक आकारणी झाल्यास किंवा रजेला जोडून उपभोगण्यास मिळाल्यास योग्य होईल	अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, मुंबई यांनी समादेशकांशी चर्चा करुन त्याबाबतचा अहवाल विशेष पोलीस महानिरीक्षक, आस्थापना, मुंबई सादर करावा.	दैनिक भत्याकरीता ८ साप्ताहिक सुट्टयांच्या मर्यादे ऐवजी ३० साप्ताहिक सुट्टयांची कमाल मर्यादा अथवा उपभोग न घेतलेल्या साप्ताहीक सुट्टयांच्या मोबदल्यात एक दिवसाचे वेतन मिळण्याबाबत दि.०३/०५/२०१९ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.	सदर मुद्याच्या अनुषंगाने अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे दि.०३/०५/२०१९ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य कार्यालयात सादर करण्यात आलेला प्रस्ताव कार्यासन क्र.३० यांनी तात्काळ शासनास प्रस्ताव पाठवून पाठपुरावा करावा.

अ. क्र.	मुद्दा सुचकाचे नाव / घटकांचे नांव / संबंधीत कार्यासन	उपस्थित केलेले मुद्दे.	अध्यक्षांचे आदेश / निर्देश	मा. अध्यक्षांच्या निर्देशाप्रमाणे संबंधीत कार्यासनाचे अभिप्राय	अध्यक्षांचे आदेश / निर्देश
८.	श्री. कमलकांत सिंह, पो.नि., गट क्र १२, हिंगोली **का.क्र. ३०**	राज्य राखीव पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी यांना बाहेर राज्यात कर्तव्य बजावत असतांना विशेष वेतन मिळावे.	सदर मुद्याच्या अनुषंगाने विशेष भत्ता मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत निर्देश दिले.	अपर पोमसं, रारापोबल, मुंबई यांनी दि. १८/०२/२०१९ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांना प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.	कार्यासन क्र. ३० यांनी शासनास प्रस्ताव पाठूवन पाठपुरावा करावा.
९.	श्री. ए. एम. कांबळे, पो.नि., रारापोबल, प्र.कें.ना, नानवीज दौंड **का.क्र. ४४**	राज्य राखीव पोलीस बलातील सशस्त्र पोलीस उप निरीक्षक यांना ही आऊट ड्युटी बंदोबस्तावेळी लाल बेल्ट परिधान करण्याची परवानगी मिळावी.	अपर पोलीस महासंचालक (धोरण), मुंबई यांना पाठपुरावा करण्याचे निर्देश दिले.	गणवेषात सुधारणा व प्रमाणिकीकरण करण्याच्या कामाचा मसुदा तयार करण्यात आला असून, सदर मसूदा वरिष्ठ पातळीवर चर्चेकरिता सादर करण्यात आले आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
१०.	समादेशक, रारापोबल, गट क्र.१५, गोंदिया **का.क्र. २८ अ**	नैसर्गिक मृत्यू आल्यास वेतन खाते असलेल्या बँकेकडून नैसर्गिक मृत्यू संरक्षण विमा पोलीस अधि./कर्म. यांना मिळण्याबाबत करार करावा.	सदर प्रकरणी इन्शुरन्स कंपनीशी चर्चा करुन कार्यवाही करावी.	विमा कंपनीच्या प्रतिनिधीशी चर्चा करुन, त्यास पोलीस अधि./कर्म. यांचेकरिता आयुर्विमा पॉलिसी काढण्याकरिता वेगवेगळया विमा कंपनीकडून सविस्तर माहिती घेऊन प्रेझेंटेशन सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.	अपर पोलीस महासंचालक, धोरण यांनी तातडीने कार्यवाही करावी.
११.	डॉ. महेश्वर रेड्डी, पोलीस अधीक्षक, चंद्रपूर **पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, नागपूर, औरंगाबाद**	उच्च न्यायालय या ठिकाणी उभे राहण्यासाठी जागा नसल्याने, पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना बसण्याकरीता वेटींग रुम तयार करण्यात यावे.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / नागपूर शहर / औरंगाबाद शहर यांना संबंधित रजिस्ट्रार (Registrar) मा. उच्च न्यायालय यांना पत्रव्यवहार करावा.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / नागपूर शहर / औरंगाबाद शहर यांचेकडून कार्यवाही अहवाल अप्राप्त आहे.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई / नागपूर शहर / औरंगाबाद शहर यांचेकडून अहवाल तात्काळ प्राप्त करावे. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

५१ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीसाठी
सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१	**मुद्दा क्र. १** श्री. अमोल निवृत्ती गागरे, पोशि/१२१६०, नवी मुंबई **वि.पो.म.नि., प्रशा. उप सहा., र. व का. का.क्र. ३६**	**सर्व पोलीस ठाणे / शाखा स्तरावरील DDO (आहरण व संवितरण अधिकारी) यांना सर्व प्रकारची बिले सादर करण्याचे अधिकार मिळणेबाबत :-** गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक एम्आयएस ०४०१६०७/ प्र.क्र.२७७ / पोल-४ / मंत्रालय, मुंबई - ४०००३२, दि. २ मे, २००९ अन्वये सहायक पोलीस आयुक्त / उप विभागीय पोलीस अधिकारी व पोलस ठाणे प्रमुखास आहरण व संवितरण अधिकारी घोषित केलेले आहे. परंतू त्यांना केवळ आकस्मिक खर्च (वर खर्च) याबाबतचे अधिकार देण्यात आलेले आहे त्यामुळे कर्मचारी यांना वारंवार पोलीस आयुक्त कार्यालय येथे हेलपाटे मारावे लागतात. घरभाडे भत्ता / थकबाकी, सरेंडर रजा बिल, प्रवास भत्ता, मेडीकलची बिले व इतर सर्व प्रकारची बिले ४ ते ५ वर्षांपासून प्रलंबित आहेत. वर नमुद शासन निर्णयामध्ये सुधारणा होऊन संपुर्ण अधिकार हे सर्व पोलीस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी यांना प्रदान केल्यास आप-आपले कार्यालयातील सक्षम कर्मचारी यांचेकडून सदरची सर्व बिले तयार करुन घेऊन DDO या पदाचे अधिकाराने त्यांचे स्वत:चे स्वाक्षरीने सर्व प्रकारच्या बिले हि कोषागार कार्यालय येथे पाठविता येणे शक्य होईल व या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र पोलीस दलातील कर्मचारी यांच्या बिलांच्या विलंबा संदर्भातील समस्या सुटतील. तरी याबाबत विचार होणेस विनंती आहे.	**कार्यासन क्रमांक ३६ :-** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयामध्ये मंत्रालयीन कर्मचारी वर्ग यांची संख्या ही पोलीस कर्मचाऱ्यांच्या संख्येचे तुलनेने फारच कमी असून त्यात कनिष्ठ श्रेणी लिपिक व वरिष्ठ श्रेणी लिपिक यांची बरीच पदे रिक्त आहेत. तसेच कार्यालयात हजर असलेल्या लिपिक वर्गीय कर्मचारी यांचेकडून प्रलंबित कामाचा निपटारा वेळचेवेळीच करुन घेत आहोत. नवी मुंबई आयुक्तालयाचे आस्थापनेवर पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांचे घरभाडे भत्ता / थकबाकी, सरेंडर रजा बिल, प्रवास भत्ता, मेडीकलची बिले व इतर सर्व प्रकारची बिले ही गेल्या ४ ते ५ वर्षापासून अशी कोणतीही देयके या कार्यालयात प्रलंबित नाहीत व जे देयक प्रलंबित आहेत त्याचा तात्काळ निपटारा करुन घेण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच सहायक पोलीस आयुक्त / उप विभागीय पोलीस अधिकारी व पोलस ठाणे / शाखा प्रभारी अधिकारी (आहरण व संवितरण अधिकारी) यांना सर्व प्रकारची बीले ही कोषागार कार्यालयातून पारित करण्याचे अधिकर प्रदान करणेबाबतची बाब ही शासन स्तरावरील आहे. सदर बैठकीत निर्णय झाल्यास शासनास प्रस्ताव पाठविण्यात येईल.	सदरचा मुद्दा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत स्वतंत्रपणे घेण्याबाबत निर्देश देऊन सदरचा मुद्दा निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२	**मुद्दा क्र. २** श्री. अमोल निवृत्ती गागरे, पोशि/१२१६०, नवी मुंबई **वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३१**	**मेडीकल बिलांबाबत :-** नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातील असंख्य मेडीकल बिले ही ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांचेकडून निर्णय न झाल्याने प्रलंबित आहेत तरी ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांना कर्मचारी यांची बिले मंजूर / नामंजूर करण्यासाठी १ ते ३ महिन्यापर्यतची अंतिम मुदत घालून द्यावी. तसेच नियमानुसार ठाणे सिव्हिल हॉस्पिटल यांना कोणकोणती कागदपत्रे हि बिलासोबत जोडून पाठविणे गरजेचे आहे याबाबतची यादी संबंधीतांना पाठवावी, म्हणजे त्याबाबत तपासणी करुनच व खात्री करुनच बिले पुढे सादर करता येईल तसेच आजारांचे यादीनुसार म्हणजे २७ (आकस्मिक आजार) + ५ (गंभीर आजार) याबाबतची बिले केवळ मंजुर केली जातात त्यामुळे इतर देखील सर्व आजारांची बिले मंजुर करण्यात यावीत. याबाबत सुरधारणा होणेस विनती आहे.	**कार्यासन क्रमांक ३१ :-**या कार्यालयाचे पत्र क्र. पोमसं/३१/वै.दे./ क.वृ.प./३०७/२०१५, दि. २४/०५/२०१९ अन्वये संचालक, संचालनालय आरोग्य सेवा, आरोग्य भवन, रुग्णालये-राज्यस्तर मुंबई यांना वैद्यकीय देयक मंजुरीकरीता आवश्यक असलेल्या कागदपत्रांची विहित सूची / यादी असल्यास या कार्यालयास उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केलेली आहे. तसेच पोलीस कर्मचाऱ्यांचे संख्याबळ व त्यांच्या वैद्यकीय प्रकरणांची वारंवारता लक्षात घेता वैद्यकीय देयके लवकरात लवकर पारित करण्याकरिता संबधीतांना आदेश देण्याबाबत कळविले आहे. शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. एम्जी २००५/९/प्र.क्र.१/ आरोग्य ३, दि.१९/०३/२००५, मधील परिशिष्ट अ मध्ये नमुद केलेल्या २७ आकस्मिक व ५ गंभीर आजारांबाबतचीच बिले मंजूर केली जातात. उपस्थित केलेल्या मुद्यांमध्ये इतर सर्व आजारांची बिले मंजूर करण्याबाबत नमूद केले आहे. परंतू सदर आजारांबाबत स्पष्ट उल्लेख केलेला नाही. तरी त्या आजारांचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे. तरी, चर्चा होऊन पुढील कार्यवाहीबाबत आदेश होणेस विनंती आहे.	सचिवांना पोलीस महासंचालक यांच्या सहीने पत्र देण्याबाबत निर्देश देऊन पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पाठपुरावा करण्याबाबत निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
३	**मुद्दा क्र. ३** श्री. अमोल निवृत्ती गागरे, पोशि/१२१६०, नवी मुंबई **वि.पो.म.नि., प्रशासन** **उप सहा., लेखा का.क्र. ३१**	**मा. पोलीस महासंचालक साो यांचे गृहकर्जाबाबत :-** DG लोनसाठी रक्कमेच्या मर्यादा घालेल्या असल्याने तसेच X,Y,Z असे शहारांचे वर्गीकरण केलेले असल्याने त्यानुसार पनवेल, खारघर, कामोठे इत्यादी ठिकाणी घरांच्या किंमती या ३५ ते ४० लाखांच्या पुढे आहेत व अशा ठिकाणी DG लोन हे २० लाखांच्या आत मिळत आहे. तसेच वित्त विभाग शासन निर्णय शासन परिपत्रक क्रमांक घबांअ-२०१२/प्र.क्र.३०/२०१२/विनियम, दि.२४/०४/२०१९ अन्वये ६ व्या वेतन आयोगानुसारच DG लोन मंजूर करावे असे नमुद केले आहे यामध्ये सुधारणा होऊन वाढीव पगारानुसार DG लोन मंजूर व्हावे. तरी, सदरची वरील सर्व प्रक्रिया कर्मचाऱ्यांचे दृष्टीने अन्यायकारक आहे. तरी पुर्वीची प्रक्रिया पुन्हा सुरु करण्यात यावी हि विनंती.	**कार्यासन क्रमांक ३१ :- शासनाने विहीत केलेल्या अटी व शर्तींना अनुसरुन राज्यातील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना घरबांधणी अग्रिम प्रदान करण्याबाबतची कार्यवाही ऑनलाईन प्रणालीद्वारे करण्यात येते.** सदरचे अग्रिम हे वित्तीय संस्थेकडून घेतलेल्या अग्रिमाची परतफेड या एकाच प्रयोजनासाठी मिळत नसून त्याव्यतिरिक्त अनेक प्रयोजन यामध्ये अंतर्भुत आहेत. सदरची सर्व प्रयोजन शासनाच्या दि.२०/२/२०१५ च्या निर्णयामध्ये नमूद आहेत. शासनाचे घरबांधणी अग्रिम प्राप्त करण्यासाठी **प्रथम एखाद्या खाजगी वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतलेच पाहिजे असे संबंधीतास बंधनकारक नाही.** एखाद्या खाजगी वित्तीय संस्थेकडून घरबांधणी कर्ज घेतले असल्यास व संबंधीतास शासनाचे गृहकर्ज हवे असल्यास, अर्जाच्या दिनांकास संबंधीत अग्रीम यांचा मेळ घातला जातो. अशा परिस्थितीत संबंधीत अर्जदारास शासनाचे गृहकर्ज दिले असता, त्यांचे खाजगी बँकेतील शिल्लक कर्जाची पूर्ण परतफेड होत असेल, तरच संबंधीतास गृहकर्ज अदा केले जाते. सदरची मिळकत खाजगी वित्तीय संस्थेकडून सोडवून शासनाकडे गहाण ठेवणे आवश्यक असल्यामुळे उपरोक्तप्रमाणे कार्यवाही केली जाते. शासनाच्या दि.२०/२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये शहरांचे वर्गीकरणानुसार तेथील घरांसाठीच्या किंमतीच्या मर्यादा ठरविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार अर्जकर्त्यास रक्कम मंजूर होते. शासन निर्णय, दि.२४/४/२०१९ चे शासन परिपत्रक हे शासन अंतर्गत सर्व विभागांसाठी समान असून ते सर्वांना बंधनकारक आहे. ७ व्या वेतन आयोगानुसार व वाढीव पगारानुसार गृहकर्ज मंजूर करावयाचे झाल्यास तसे शासनाचे सर्व विभागांना सुधारित आदेश होणे आवश्यक आहे. सदर मुद्यांमध्ये पुर्वीची प्रक्रिया पुन्हा सुरु करणेबाबत नमूद आहे. सध्या सुरु असलेली ऑनलाईन प्रक्रिया ही पूर्वीप्रमाणेच शासन निर्णयातील अटी व शर्तींनुसार सुरु आहे. त्यामुळे पूर्वीची व सध्या सुरु असलेल्या प्रक्रियेमध्ये कोणतीही भिन्नता नाही. तसेच सदर प्रक्रियेद्वारे माहे एप्रिल, २०१९ अखेर पर्यंत ४,२४२ कर्मचाऱ्यांना रु.७७७.०० कोटी इतके अग्रिम अदा केले आहे.	शासनास प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
४	**मुद्दा क्र. ४** श्री. आर.बी. जगताप, सहा.पो.उप निरी. पुणे शहर **वि.पो.म.नि., आस्था उ.स.,आस्था.-२** **का.क्र. ५**	पोलीस उप निरीक्षक पदासाठी पदोन्नतीची अर्हता परिक्षा सन २०१३ मध्ये घेण्यात आलेली आहे. त्यामधील पात्र उमेदवारांची यादी सेवाज्येष्ठतेनुसार व नियमावलीप्रमाणे प्रसिध्द करुन पात्र कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर पदोन्नती देण्यात यावी. सार्वत्रिक बदल्या	**कार्यासन क्रमांक ५ :-** अर्हता परिक्षा सन २०१३ मध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची यादी सेवाज्येष्ठतेनुसार तयार करुन त्यांना रिक्त पदांवर पदोन्नती देण्याबाबत प्रचलित नियमांमध्ये आवश्यक ते बदल करुन पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्याचे कामकाज सुरु आहे.	त्वरीत कार्यवाही पुर्ण करण्याबाबत निर्देश दिले.
५	**मुद्दा क्र. ५** श्री. अजित शामराव खरात, पोलीस उप निरीक्षक, (अभियांत्रिकी), बि.सं.वि., मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई (अपर पोलीस महासंचालक, व संचालक, पोलीस बिनतारी संदेश, महाराष्ट्र राज्य,मुंबई) **वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा** **का.क्र. ३०**	पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना दोन वर्षातून एकदा स्वग्राम प्रवासभत्ता (एलटीसी) देय आहे. त्याकरीता चाकोरीतून देयक सादर करावे लागते. या प्रक्रियेमध्ये अतिरिक्त वेळ श्रम व मनुष्यबळ खर्ची पडते. जसे आहार भत्ता सरसकट पगारात देण्यात येतो, त्या धर्तीवर दोन वर्षातून एकदा अधिकारी/कर्मचारी यांचे सेवापटावरील मुळ गावाचा विचार करुन सरसकट स्वग्राम प्रवासभत्ता अधिकारी/कर्मचारी यांचे खात्यावर जमा करण्यात यावा, ही विनंती.	**कार्यासन क्रमांक ३० :-** शासनाचे सर्व अधिकारी / कर्मचारी (पोलीस अधिकारी/कर्मचाऱ्यासह) यांना शासन निर्णय वित्त विभाग क्र-रप्रस-१११४/प्र.क्र.११/सेवा-५ दि.१०/०६/२०१५ नुसार शासनाने विहित केलेल्या गटवर्षानुसार दोन वर्षातून एकदा स्वग्राम सवलत (L.T.C) किंवा चार वर्षातून एकदा महाराष्ट्र दर्शन प्रवास भत्ता सवलत दिली जाते. पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या बाबतीत L.T.C च्या धर्तीवर सेवा पटावरील मुळ गावचा विचार करुन सरसकट भत्ता देणेबाबत बैठकीत चर्चा / विचार विनिमय झाल्यास तसा प्रस्ताव शासनास सादर करावा अगर कसे याबाबत आदेश व्हावेत.	सदरची मागणी योग्य नसल्याने, मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
६	**मुद्दा क्र. ६** श्री. अजित शामराव खरात, पोलीस उप निरीक्षक, (अभियांत्रिकी), बि.सं.वि., मुख्य नियंत्रण कक्ष, मुंबई **पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई** **वि.पो.म.नि., प्रशासन** **उप सहा., लेखा** **का.क्र. ३०**	राज्यातील सर्व जिल्हे, आयुक्तालय (मुंबई वगळून) येथील पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना पगारात वाहन भत्ता देय आहे. परंतु मुंबई शहरात सदर भत्ता मिळत नाही. इतर जिल्हे व आयुक्तालय यांचेप्रमाणे मुंबई शहारातील अधिकारी / कर्मचाऱ्यांनाही सदर वाहन भत्ता लागू करावा, हि विनंती.	**कार्यासन क्रमांक ३० / पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई :-** १) वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. वाहभ १०९८/प्र.क्र.८३/९८/सेवा५, दि.१४/१२/१९९८ च्या शासन निर्णयानुसार "ज्या कर्मचाऱ्यांना शासकीय वाहतूक सुविधा पुरविण्यात आली आहे, त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही" असे नमुद केले आहे. २) गृह विभागाचा दि. ०४ मार्च, १९९१ चा शासन निर्णयानुसार मुंबई महानगर पालिकेच्या बी.ई.एस्.टी. परिवहन उपक्रमांच्या बसेसमधून कर्तव्यार्थ विनातिकीट प्रवास करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या प्रवास खर्चापोटी बी.ई.एस्.टी. परिवहन उपक्रमास ढोबळ वार्षिक अनुदान दिले जाते.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
७	**मुद्दा क्र. ७** श्री. पी.पी. खडपकर, पोलीस उप निरीक्षक, गट क्र.१, पुणे **वि.पो.म.नि., आस्था** **व.उ.स.,आस्था. -१** **का.क्र. ३**	महाराष्ट्र पोलीस दलाचे राज्य राखीव पोलीस बल हे अविभाज्य दल असून सदरचे दल हे वर्षातील ८ ते १० महिने विशेष बंदोबस्ताकरीता घराबाहेर असते, त्यामुळे कौटुंबिक अडचणी, मुलांचे शिक्षण, कुटूंबातील आजारी व्यक्ती यांची सुश्रुषा करणेकरीता जवानांना रजा अपुरी असल्याने सिक पर्याय निवडावा लागतो, तरी प्रतिमहा दीड दिवस प्रमाणे १८ दिवस नैमित्तीक रजा मिळावी.	**कार्यासन क्रमांक ३ :-** अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दि. १२/०६/२०१९ च्या पत्रान्वये सदर मुद्दा वगळयाबाबत खालील कारण दिले आहे :- राज्य राखीव पोलीस बल कर्मचाऱ्यांना एकुण १२ नैमित्तीक रजा देय आहेत. तसेच राज्य राखीव पोलीस बलाचे कर्तव्याचे स्वरुप हे पोलीस दलापेक्षा वेगळया स्वरुपाचे असून त्यांना वर्षातील २०० ते २५० दिवस सतत मुख्यालयापासून / घरापासून कर्तव्याकरिता दूर रहावे लागते व त्यांच्या साधारणत: २५ ते ३० साप्ताहिक सुट्टया व्यपगत होत असल्याने, शासन निर्णय गृह विभाग क्र. पीएए-०३९८/प्र.क्र.८५/पोल-५अ, दि.०६/०८/२०१५ मध्ये नमूद केलेल्या दैनिक भत्याकरीता ८ साप्ताहिक सुट्टयांच्या मर्यादेऐवजी ३० साप्ताहिक सुट्टयांची कमाल मर्यादा अथवा उपभोग न घेतलेल्या साप्ताहिक सुट्टयांचा मोबदल्यात एक दिवसाचे वेतन (मुळ वेतन + इतर भत्ते) मिळण्याबाबत अपर पोलीस महासंचालक, रारापोबल, मुंबई यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाला आहे.	प्रस्ताव शासनाकडे पाठवून पाठपुरावा करण्याबाबत निर्देश दिले. तसेच अपर पोमसं, रारापोबल, मुंबई यांना चर्चा करण्याबाबत निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
८	**मुद्दा क्र. ८** श्री. महिपाल सिंह चांदा, पोलीस उप अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गोंदिया **वि.पो.म.नि., प्रशासन व.उ.स., नि. वे. का. क्र. २८.**	दि.९/४/२०१९ रोजी लोकसभा निवडणुक बंदोबस्ताकरीता ठाणे शहर येथील पोशि नितीन मोहन कांबळे हे कर्तव्यावर आले असताना अचानक प्रकृती खराब झाल्याने, त्यांना जिल्हा सामान्य के.टी.एस. रुग्णालय, गोंदिया येथे भरती करण्यात आले असता, तेथील वैद्यकीय अधिकारी यांनी पुढील उपचाराकरीता नागपूर येथे रेफर केले पोलीस विभागातील रुग्णवाहिकाने नागपूर येथे नेत असता रुग्णवाहिका बंद पडली. त्यावेळेस १०८ वर नंबर लावून रुग्णवाहिका पाठविण्याची विनंती केली असता खाजगी रुग्णालयात पेशंट नेण्याकरीता रुग्णवाहिका उपलब्ध करुन घेता येत नाही असे तेथील महिला अधिकाऱ्यांनी सांगितले. तरी पोलीस आरोग्य कुटूंब योजना अंतर्गत प्लॉनवर असलेल्या दवाखान्यात पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना भरती करण्याकामी शासकीय रुग्णालयातून १०८ ची रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्यात यावी.	**कार्यासन क्रमांक २८ :-**नक्षलग्रस्त जिल्ह्यातील (चंद्रपूर / गोंदिया / गडचिरोली) कार्यरत पोलीस अधिकारी / कर्मचारी आणि त्यांच्या कुटूंबातील व्यक्ती महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवर घेण्यात आलेल्या खाजगी रुग्णालयात निकडीच्या प्रसंगी औषधोपचाराकरीता दाखल होण्यासाठी त्यांनी जर रुग्णवाहिकेची १०८ क्रमांकाकडे मागणी केल्यास त्यांना विनामुल्य रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याबाबत संबंधीतांना योग्य ते निर्देश देऊन तसे या कार्यालयास कळविण्याबाबत प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना दि.७/६/२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे. **तरी, सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.**	सदर प्रकरणी पोलीस अधीक्षक, गोंदिया यांचेशी चर्चा करण्याचे निर्देश देऊन मुद्दा निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
९	**मुद्दा क्र. ९** श्री. महिपाल सिंह चांदा, पोलीस उप अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गोंदिया **अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई.** **वि.पो.म.नि., आस्था / का. व सु. उ.स.,आस्था. -२ / गुन्हे का.क्र. ६ / २१ अ**	गडचिरोली जिल्हा पोलीस दलामध्ये भरती होत असताना तेथीलच रहिवासी उमेदवारांना प्रवेश देण्यात येणार असे शासनाने ठरविलेले असून त्याच धर्तीवर नक्षलग्रस्त गोंदिया जिल्ह्यामध्ये तशीच तरतूद करण्यात यावी.	**अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके :-**सदरहू मुद्यासारख्याच एका प्रकरणात पोलीस अधीक्षक, गोंदिया यांनी त्यांच्या क्र.पोअगों/कक्ष-१०/भाषा/८००१ /२०१७, दि.३१/१०/२०१७ च्या पत्रान्वये पोमसं कार्यालयास प्रस्ताव सादर केला होतो. सदरहू प्रस्ताव पोमसं कार्यालयाच्या क्र.पोमसं/२१-अ/ १९५/गोंदिया पोलीस भरती-वास्तव्य दाखला/ २२/२०१७, २२/११/२०१७ च्या ज्ञापासोबत या कार्यालयास प्राप्त झाला होता. त्याबाबत अपर पोमसं (आस्थापना), मुंबई / अपर पोमसं (का. व सु.), मुंबई व पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याशी विचारविनिमय करुन पोलीस शिपाई पदाच्या सेवाप्रवेश नियमांमध्ये कोणतीही सुधारणा करण्याची आवश्यकता नसल्याबाबत त्यावेळी निर्णय घेण्यात आला आहे. सदरहू निर्णय या कार्यालयाच्या क्र.प्रशि/पो.शि.भरती/लेखी परीक्षा-स्थानिक भाषा/ दिया/१०/१०२०/२०१७, दि.२२/१२/२०१७ च्याज्ञापान्वये पोलीस अधीक्षक, गोंदिया यांच्यासह अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती, मुंबई व पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र यांना कळविण्यात आलेला आहे. **कार्यासन क्र. ६ / २१-अ :-** सदर मुद्याच्या अनुषंगाने पोलीस शिपाई पदाच्या भरतीच्या नियमांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करण्याची आवश्यकता नाही असे अपर पोलीस महासंचालक (विशेष कृती), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे अभिप्राय दिले आहेत. **तरी सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.**	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१०	**मुद्दा क्र. १०** श्री. महिपाल सिंह चांदा, पोलीस उप अधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, गोंदिया **वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा** **का.क्र. ३०**	तपासकामी, चौकशीकामी, समन्स वॉरंट तामीली तसेच पेट्रोलिंग या सारख्या कर्तव्यावर जाण्याकामी अधिकारी / कर्मचारी हे आपल्या खाजगी दुचाकी व चारचाकी वाहनाचा वापर करतात. त्यांना इंधन खर्च दैनिक भत्त्यात कि.मी. प्रमाणे मिळावे.	बैठकीत विचार विनिमय होऊन निर्णय होण्यास विनंती आहे.	इंधन खर्च दैनिक भत्त्यात कि.मी. प्रमाणे देता येते की नाही याबाबत नियम बघून कार्यवाही करावी.
११	**मुद्दा क्र.११** श्री. व्हि. के. कुबडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी-चिंचवड, **वि.पो.म.नि., प्रशासन उ.स., वि. चौ.** **का. क्र. ११**	पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये हेवेदावेतून गैरलागू अर्ज केले जातात. त्यामुळे प्रामाणिक, कार्यक्षम पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना त्याचा मानसिक व शारिरीक तसेच शासकीय प्रणालीचा त्रास होऊन त्यांच्यातील काम करण्याच्या प्रवृत्तीला छेद मिळतो व त्याच्या कार्यक्षमतेवर त्याचा परिणाम होतो. जे अधिकारी व कर्मचारी विनाकारण अशा प्रकारचे अर्ज करतात अशा पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द चौकशीअंती शिस्तभंगात्मक कार्यवाही होणे गरजेचे आहे.	**कार्यासन क्र. ११ :-** अशा प्रकारच्या गैरलागू अर्जाची पडताळणी करुन अर्जामधील तक्रारीची वस्तुस्थिती तपासणे आवश्यक आहे. तसेच अश्याप्रकारच्या अर्जाचा उद्देश तपासणे हेही महत्वाचे आहे. अर्जाची पडताळणी केल्यानंतर अर्जामागील उद्देश एकमेकांच्या हेवेदावेतून केलेला असेल तर अशा अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द अशाप्रकारचे गैरवर्तन केल्याबद्दल महाराष्ट्र पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम, १९५६ मधील नियम क्र.३ (२) नुसार त्या कर्मचाऱ्याविरुध्द गैरवर्तन केले म्हणून संबंधित घटक प्रमुख शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास सक्षम ठरतात.	अशाप्रकारचे गैरवर्तन केल्यास त्यांच्याविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१२	**मुद्दा क्र.१२** श्री. व्हि. के. कुबडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी-चिंचवड, **वि.पो.म.नि., प्रशासन उ.स., वि. चौ. का. क्र. ११**	पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये वादातून अर्ज केले जातात. सदरचे अर्ज नियमाप्रमाणे वरिष्ठांचे नावाने करुन त्यांचेकडे पोचविणे संबंधीत तक्रारदार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची जबाबदारी आहे. परंतु संबंधीत पोलीस अधिकारी व कर्मचारी हे वरिष्ठांना अर्ज न देता परस्पर प्रसार माध्यमांना देऊन ते संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यांची बदनामी करुन पोलीस दलाची प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न करतात. जे पोलीस अधिकारी व कर्मचारी हे वरिष्ठांकडे अर्ज न करता परस्पर प्रसार माध्यमांना अशा प्रकारचे अर्ज करतील, तसेच सदरचे अर्जामध्ये चौकशीअंती काही निष्पन्न न झाल्यास संबंधीत तक्रारदार पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेविरुध्द कडक शिस्तभंगात्मक कार्यवाही होणे गरजेचे आहे.	**कार्यासन क्र. ११ :-** पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेमध्ये वादातून अर्ज केले जातात. व सदरचे अर्ज वरिष्ठांना संबंधीत कर्मचाऱ्याची बदनामी करण्याच्या हेतूने प्रसार माध्यमांना देतात. अश्यामुळे निश्चितच पोलीस दलाची प्रतिमा मलीन होते. शासकीय कर्मचाऱ्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाला महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ मधील नियम क्र.९ अन्वये वृत्तपत्रे किंवा आकाशवाणी किंवा दूरदर्शन यांच्याशी संपर्क ठेवण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. जर एखाद्या कर्मचाऱ्याने अशाप्रकारचे कृत्य केल्याचे चौकशअंती निष्पन्न झाल्यास त्याचेविरुध्द वरिल नियमाखाली शिस्तभंगाची चौकशी करुन कार्यवाही करण्याची तरतूद आहे. त्यानुसार संबंधित सक्षम प्राधिकारी त्यांचेविरुध्द कारवाई करण्यास सक्षम ठरतात.	सदर मुद्याच्या अनुषंगाने प्रस्तुत नियमांत वृत्तपत्रे, आकाशवाणी, दुरदर्शन तसेच सामाजिक प्रसार माध्यमांशी संपर्क ठेवण्यास प्रतिबंध करण्याबाबतचे परिपत्रक काढावे, व mahapolice या वेबसाईटवर प्रसारीत करावेत.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१३	**मुद्दा क्र. १३** पोशि/गणेश काकड, नेम. महाराष्ट्र पोलीस अकॅडामी, नाशिक **वि.पो.म.नि., आस्था व.उ.स.,आस्था.-१ का.क्र. ३-अ**	राखीव पोलीस उप निरीक्षक हे पद परीक्षा पास झाल्यानंतर बिंदू नामावलीप्रमाणे न भरता सदरचे पद गुणवत्ता यादीप्रमाणे (Merit List) व रिक्त पदानुसार भरण्यात यावे. तसेच राखीव पोलीस उप निरीक्षक पदाची परीक्षा देण्यासाठी पात्रता १२ वी पास, जिल्हा कवायत निदेशक (DDI) प्रशिक्षण पुर्ण केलेले असावे. सदर परीक्षेकरीता सध्या पोलीस हवालदार पदावर चार वर्षे सेवेची अट आहे. परंतु पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे एक टप्पा पदोन्नती (One Step) रद्द झाल्याने, जिल्हा पोलीस दलात पोलीस हवालदार होण्यास साधारणत: २४ वर्ष सेवा पुर्ण असावी लागते व त्यामुळे तरुण कर्मचारी राखीव पोलीस उप निरीक्षक होण्यापासून वंचित रहातात. तरी सदरची अट शिथील करुन १२ वर्ष सेवा पुर्ण त्यामध्ये ३ वर्ष पोलीस प्रशिक्षण केंद्र येथे सहायक कवायत निदेशक म्हणून काम केलेले असावे. अशी सुधारीत अट असावी जेणेकरुन नवीन जोमाचे, शारिरीक व मानसिक दृष्ट्या सक्षम अधिकारी खात्याला मिळतील.	**कार्यासन क्रमांक ३ अ :-** पदोन्नतीतील आरक्षणासंदर्भात शासन निर्णयातील विहीत केलेल्या तरतूदींनुसार / धोरणानुसार बिंनदूनामावलीतील उपलब्ध रिक्त पदांवर राखीव पोलीस निरीक्षकांचे पद पदोन्नतीने भरण्यात येते. जिल्हयातील / पोलीस आयुक्तालयातील राखीव पोलीस उप निरीक्षकांची पदे विभागीय अर्हता परिक्षेने भरावयाचे सेवाप्रवेश नियम-२०१४ तयार करणेबाबत अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांचे पत्र क्र.प्रशि/परीक्षा/रा.पो.उपनि.परीक्षा-नियम/०१/१४/८८७, दि.००/०२/२०१७ अन्वये प्राप्त झालेला प्रस्ताव या कार्यालयाचे क्र.पोमसं/५-अ/ रापोउपनि सेप्र/५५/२०१०, दि.८/३/२०१७ च्या पत्रान्वये प्रस्ताव सहमतीने शासनास सादर करण्यात आलेला आहे. **परिक्षेसाठी सेवा पात्रता** :- जिल्हयातील/पोलीस आयुक्तालयात त्या वर्षीच्या ३० एप्रिल रोजी १० वर्षे पोलीस शिपाई पदावर सलग सेवा पूर्ण करणारे आणि किमान ३ वर्षे पोलीस मुख्यालयातील सेवा करणारे उमेदवार सदर परीक्षेसाठी पात्र राहतील. **कवायत निदेशक पाठ्यक्रम**:- सदर अर्हता परीक्षेत बसण्यासाठी उमेदवाराने कवायत निदेशकाचा (DDI) पाठ्यक्रम परीक्षेचा अर्ज करतेवेळी पूर्ण करणे आवश्यक आहे. **गुणवत्ता यादी :-** विभागीय अर्हता परिक्षेमध्ये उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांना त्यांच्या सेवाज्येष्ठतेनुसार रिक्त पदांवर नियुक्ती दिली जाईल. मात्र त्यांची आपापसातील सेवाज्येष्ठता त्यांची पोलीस खात्यात भरती झाल्याची तारीख व त्यानंतर त्यांची जन्मतारीख व शासनाने वेळोवेळी विहित नियमांच्या आधारे ठरविण्यात येईल. तथापि, उक्त नमूद प्रमाणे सेवाप्रवेश नियम मंजूरीसाठी अद्याप शासन स्तरावर प्रतिक्षाधिन आहेत.	अपर पोमसं, रारापोबल, मुंबई यांना पॅरा मिलीटरी फोर्सेस नियम काय आहेत ते तपासावे. तसेच गुजरात / कर्नाटक / मध्य प्रदेशमध्ये SRPF साठी काय नियम आहेत. ते पाहून कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१४	**मुद्दा क्र. १४** पोशि/गणेश काकड, नेम. महाराष्ट्र पोलीस अकॅडामी, नाशिक **अ.पो.म.सं., नि. व स.** **स.पो.म.नि., नि. व स.** **का. क्र. १८**	महाराष्ट्रातील सर्व प्रशिक्षण केंद्र येथील कवायत निदेशक (DI) यांचेकरीता प्रथम श्रेणी गणवेश व शुज, पी.टी. गणवेश व शुज तसेच जंगल कॅम्प गणवेश (कंमाडो डांगरी) व शुज एकसारखा असावा. त्यासाठी शासनाने कपडा व शुज एकत्र खरेदी करावे म्हणजे रंगामध्ये तफावत असणार नाही.	**कार्यासन क्रमांक १८ :-**पोलीस कर्मचारी यांना गणवेष भत्ता अनुदान प्राप्त झाल्यावर, ते त्या अनुदानातून गणवेषाचे कापड खरेदी करुन कर्तव्यावर गणवेष परिधान करीत असतात. परंत प्रत्येक पोलीस कर्मचारी आप-आपल्या सोईनुसार गणवेषाचे कापड खरेदी करीत असल्याने, प्रत्येक पोलीस कर्मचाऱ्यांच्या खाकी गणवेषामध्ये वेगवेगळ्या छटा (Shade) दिसून येतात. त्यामुळे सर्व पोलीस कर्माचाऱ्यांच्या गणवेषामध्ये एकसारखेपणा (Uniformity) दिसण्यासाठी खाकी रंगातील एकच छटा (Shade) निश्चित करण्याबाबत या कार्यालयाकडून कार्यवाही सुरु असल्याबाबत दि.२३/५/२०१९ च्या ज्ञापान्वये संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक यांना कळविले आहे. **तरी सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.**	याबाबत अपर पोमसं, का. व सु. यांचे अध्यक्षतेखाली अपर पोमसं, लोहमार्ग / नि. व स. / रारापोबल / प्रशिक्षण व खास पथके यांची समिती करावी व या संदर्भातील अहवाल एका आठवड्यात सादर करण्याबाबत निर्देश दिले.
१५	**मुद्दा क्र. १५** श्री. अनिल उत्तम काळे, पोहवा/१५५८, पुणे ग्रामीण **अ.पो.म.सं., नि. व स.** **उ.स., पुनर्रचना** **का.क्र. २७**	पोलीस स्टेशनमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांना विश्रांती करीता स्वतंत्र रुमची आवश्यक आहे. ज्या प्रकारे शिक्षकांना स्टाफ रुम असतो त्याप्रमाणे तो विश्रांती रुम असावा.	**कार्यासन क्रमांक २७ :-** पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रातील काही पोलीस ठाण्यांमध्ये बांधकाम पुर्ण झालेले आहे. तसेच काही पोलीस ठाण्यांचा प्रस्ताव प्राप्त होताच कार्यवाही करण्याची तजवीज ठेवण्यात आली आहे. उर्वरित पोलीस ठाण्यांमध्ये महिला पोलीस कर्मचाऱ्यांकरिता विश्रामगृह व स्वच्छतागृह बांधण्याबाबत चर्चेअंती निर्णय घेण्यात यावा.	किती पोलीस ठाण्यांमध्ये विश्रांती रुम झाले आहेत. याबाबतची माहिती mahapolice या वेबसाईटवर प्रसारित करावी.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१६	**मुद्दा क्र.१६** श्री. अनिल उत्तम काळे, पोहवा/१५५८, पुणे ग्रामीण **वि.पो.म.नि., प्रशासन उ.स., र. व का.** **का. क्र. ८ अ**	घटकातील काही पोलीस स्टेशनला कायमस्वरुपी / अंशकालीन सफाई कर्मचारी यांची नेमणूक करणेत आलेली आहे. परंतु काही पोलीस स्टेशनमध्ये सफाई कर्मचारी यांची नेमणूक नसल्याने याठिकाणी टॉयलेट / बाथरुमची स्वच्छता होत नाही. अशा पोलीस ठाणेमध्ये कायमस्वरुपी अंशकालीन सफाई कामगारांच्या नेमणुका होणे आवश्यक आहे.	**कार्यासन क्रमांक ८ अ :-** अंशकालीन सफाई कामगारांची नेमणुक ११ महिन्याकरिता तात्पुरत्या स्वरुपात करण्यात येतात. सदरच्या नेमणूका करण्याचे अधिकार संबंधीत घटक प्रमुखांना आहेत. सदरची कार्यवाही घटक प्रमुखांकडून अपेक्षित आहे.	किती घटकातील पोलीस स्टेशनला अंशकालीन सफाई कर्मचारी नाहीत. त्याची माहिती काढावी. तसेच ज्या ठिकाणी सफाई कर्मचारी नाही त्याठिकाणी सफाई कर्मचारी नेमण्यासाठी घटक प्रमुख यांना योग्य निर्देश द्यावे.
१७	**मुद्दा क्र.१७** श्री. अनिल उत्तम काळे, पोहवा/१५५८, पुणे ग्रामीण **अ.पो.म.सं., नि. व स. उ.स., पुनर्रचना** **का.क्र. २७**	नवीन पोलीस स्टेशनला अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने नाहीत. सदरची निवासस्थाने झाली तर कर्मचाऱ्यांचा जाण्या-येण्याचा वेळ वाचेल व पोलीस कर्मचारी हे कामाच्या ठिकाणी लवकर हजर राहून आपले कर्तव्य तत्परतेने बजावतील.	**कार्यासन क्रमांक २७ :- (**१) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण मुख्यालय येथे तसेच त्यांच्या आस्थापनेवरील हवेली, लोणीकाळभोर, लोणीकंद, देहूरोड, पौंड, वेल्हा, मंचर, घोडेगाव, भोर, राजगड, जेजूरी, सासवड, बारामती शहर, बारामती तालुका, इंदापूर, वालचंदनगर, वडगाव-निंबाळकर, भिगवण, रांजणगाव एमआयडीसी, शिक्रापूर, शिरुर, जुन्नर, नारायणगाव, आळेफाटा, ओतूर, खेड, चाकण, आळंदी, दौड, यवत, तळेगाव, लोणावळा शहर, लोणावळा ग्रा., वडगाव मावळ, तळेगाव एमआयडीसी व कामशेत पोलीस ठाणे येथे शासकीय निवासस्थाने बांधकामाबाबत महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण महामंडळ यांचेकडे कार्यवाही चालू आहे. (२) लोणावळा (तुंगार्ली) येथे १२९१४ चौ.मि. जमीन भूसंपादनाची तसेच अपर पोलीस अधीक्षक, बारामती येथे बारामती नगरपरिषद विकास योजनेंतर्गत भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. भूसंपादन झाल्यावर येथे निवासी व अनिवासी इमारतींचे बांधकाम करण्यात येईल, असे पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांनी कळविले आहे.	कोणकोणत्या जिल्ह्यामध्ये बांधकामे सुरु आहेत. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.) यांनी माहिती मागवून सदरची माहिती mahapolice या वेबसाईटवर प्रसारित करण्याबाबत निर्देश दिले. २ ते ३ वर्षामध्ये विविध प्रकल्प पुर्ण करण्यात यावेत.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१८	**मुद्दा क्र.१८** श्री. ताहिर हुसैन, पोहवा/१७११, नागपूर शहर **वि.पो.म.नि., आस्था व.उ.स.,आस्था.-१** **का.क्र. ३** **(नोडल डेस्क)**	पोलीस अधिकारी व कर्मचारी हे कर्तव्यावर हजर असतांना (सी.आर.मोबाईल, पीटर मोबाईल चार्ली मोबाईल, नाईट गस्त, नाकाबंदी वगैरे) त्यांचा काही वेळा अपघात झाल्यावर किंवा कायदा व सुव्यवस्थेचे वेळी जखमी झाल्यावर त्यांना उपचाराकरीता हॉस्पिटलमध्ये लागते व त्यांना बेडरेस्ट दिला जातो. त्यांचा बेडरेस्टचा कालावधी मेडीकल रजेमध्ये समाविष्ट होतो. असे न होता त्यांचा उपचाराचा कालावधी **I.O.D. (इंज्युरी ऑन ड्युटी)** मध्ये गणना करण्यात यावा.	**कार्यासन क्रमांक ३ :-** उपस्थित केलेल्या मुद्दयाप्रमाणे I.O.D. (इंज्युरी ऑन ड्युटी) अशा रजेची तरतूद सध्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधील नियमात विहित केलेली नाही. यास्तव या मुद्यानुसार सदरहू रजेची आवश्यकता असल्याबाबत निश्चित ठराव झाल्यास त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सदर करण्यात येईल.	१ वर्षापासून इंज्युरी ऑन ड्युटी अशी किती प्रकरणे आहेत. याबाबतची माहिती घेऊन या संदर्भात विपोमनि, आस्थापना यांनी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.
१९	**मुद्दा क्र.१९** श्री. ताहिर हुसैन, पोहवा/१७११, नागपूर शहर **वि.पो.म.नि., आस्था / प्रशासन** **उ.स., र. व का.** **का.क्र. १०**	पोलीस कर्मचारी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होण्याअगोदर निधन पावले तर त्यांचे वारसदारांना अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावुन घेण्यात येते. परंतु अधिकारी जर त्यांचे सेवाकालावधीत मरण पावले तर त्यांचे वारसांना अनुकंपा तत्वावर नोकरीवर सामावुन घेण्याची सवलत लागू नाही. तरी, शासन स्तरावर सदर बाबीचा पाठपुरावा करुन योग्य ते आदेश निर्गमीत करण्यात यावे.	**कार्यासन क्रमांक १० :-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा-१००४/प्र.क्र.५१/२००४/आठ, दि.२२/०८/२००५ नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या गट "क" व गट "ड" संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियांनाच अनुकंपा तत्वावर नियुक्ती अनुज्ञेय राहील, अशी तरतूद विहित आहे. त्यामुळे गट "अ" व गट "ब" संवर्गातील अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना उपरोक्त शासन निर्णयान्वये विहित केलेली अनुकंपा तत्वावर नोकरीवर सामावुन घेण्याबाबतची सवलत अनुज्ञेय होत नाही. मान्य झाल्यास त्याप्रमाणे शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२०	**मुद्दा क्र.२०** श्री. ताहिर हुसैन, पोहवा/१७११, नागपूर शहर **अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**	पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई या कार्यालयांकडून विविध प्रशिक्षणाकरीता विविध पशिक्षणास्थळी पाठविण्यात येते. प्रशिक्षणास पाठविण्यापूर्वी त्यांना काही रक्कम मेस अग्रीम म्हणून अदा करणेबाबत कळविण्यात येते. परंतु सदरचा अग्रीम हा प्रशिक्षण फंडातून देण्यात यावा. याबाबत स्पष्ट सूचना देण्यात येत नाही. प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात आलेले अधिकारी व कर्माचारी हे प्रशिक्षणास जाण्या अगोदर कार्यालयामार्फत त्यांचा प्रशिक्षण कालावधी तसेच प्रशिक्षण देण्यात येत असलेल्या शहरांच्या दैनिक भत्त्याची रक्कम लक्षात घेऊन संबंधीतांना नियमानुसार ७५% प्रवास भत्ता अग्रीमाची रक्कम मेस अग्रीमाचे स्वरुपात अदा करण्यात येते. पोलीस अधिकारी व कर्मचारी हे प्रशिक्षणास्थळी हजर झाल्यानंतर त्यांना मेस अग्रीम व निवास शुल्क, भोजनालय व्यवस्थापन, विकास निधी, विद्युत निधी, फोटो इत्यादी रक्कम भरावी लागते. त्यांची एकूण रक्कम ही त्यांचे प्रशिक्षण कालावधीची प्रवास भत्ता देयकाचे रक्कमेपेक्षा जास्त होते. प्रवास भत्ता देयकातील अदा करण्यात आलेल्या आगावू अग्रीमाची रक्कम कपात करुन त्यांना उर्वरित रक्कम ही प्रवास भत्ता म्हणून अदा करण्यात येते. पंरतु सदरची रक्कम ही कमी असल्यामुळे त्यांचा मेस अग्रीम व इतर खर्च मंजूर करणे शक्य होत नाही. या कारणाने प्रशिक्षणार्थींचे आर्थिक नुकसान होत असते. त्यामुळे प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास जाण्यास इच्छुक होत नाही. तरी, मेस अग्रीम व निवास शुल्क, भोजनालय व्यवस्थापन, विकास निधी, विद्युत निधी, फोटो इत्यादी रक्कम असा एकूण खर्च यांचा समावेश हा प्रशिक्षण खर्चात केल्यास कोषागार कार्यालय सुध्दा देयकात आक्षेप घेणार नाही व संपूर्ण खर्च झालेली रक्कम प्रशिक्षणार्थीं यांना मिळेल व ते अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षणास जाण्यास इच्छुक होतील.	**अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई :-** पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना विविध प्रशिक्षणाकरिता भारतातील विविध प्रशिक्षणस्थळी पाठविण्यात येते, प्रशिक्षणास पाठविण्यापुर्वी काही प्रशिक्षण केंद्र त्यांच्या सूचनान्वये काही रक्कम मेस अग्रीम म्हणून अदा करणेबाबत कळवितात. तथापि, मेस व निवास शुल्क, भोजनालय व्यवस्थापन व इतर प्रशिक्षणाकरिता झालेल्या देय रक्कमांपैकी दैनिक भत्ता व प्रवास या संबंधीत झालेला खर्च संबंधीत पोलीस घटकाने नियमानुसार दैनिक भत्ता व प्रवास भत्ता यामधून भागवावा व उर्वरित प्रशिक्षण खर्च त्या संबंधीत घटकांनी त्यांना मंजूर असलेल्या प्रशिक्षण फंडातून वित्तीय नियमानुसार करण्याबाबत या कार्यालयाकडून कळविण्यात येत आहे.	सदरबाबत सर्व घटक प्रमुखांना २ दिवसात सूचना देण्याबाबत निर्देश देऊन mahapolice या वेबसाईटवर प्रसारीत करावे, व सर्व सभासदांना प्रशिक्षणाबाबतचे परिपत्रक देण्यात यावा. तसेच प्रशिक्षणासाठी जे अनुदान येते ते प्रशिक्षण केंद्रांना देण्याबाबत निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२१	**मुद्दा क्र. २१** श्री. दिक्षीतकुमार गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग **वि.पो.म.नि., प्रशासन** **उप सहा., लेखा** **का.क्र. ३१**	पोलीस कर्मचारी यांचा कर्तव्याचा वेळ अधिक असून २४ तासांवर कर्तव्य बजावत असलेल्या कर्मचारी यांना रिवार्ड म्हणून एखादी जीएसटी तरी मिळावी. उदा. जिल्ह्याच्या ठिकाणी कार्यरत पोलीस कर्मचारी यांना एस्कॉर्ट, खजाना पार्टी, लांब पल्याची आरोपी, सुरक्षा गार्ड.	**कार्यासन क्रमांक ३१ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. एडब्ल्यूडी-०११५/प्र.क्र.२६८/पोल-१, दि. २९/११/२०१८ मध्ये पोलीस कर्मचारी यांना देण्यात येणाऱ्या बक्षिसांबाबत मार्गदर्शक सुचना आणि आर्थिक मर्यादा नमुद केलेल्या आहेत. (अ) धैर्य, कौशल्य, धडाडी, आवश्यक असलेल्या घटनांचा तपास करणे, तुरुगांतून पळालेल्या विशेषत: जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कैद्याला पुन्हा पकडणे, फरार (Wanted) गुन्हेगारांना कैद करणे. (ब) तत्परता, प्रामाणिकपणा आणि बुध्दीकौशल्य वापरुन तपासणी कार्यात महत्वाची मदत करणे (क) तत्परता दर्शविणारे, हुशारीने पार पाडलेले / जनतेच्या स्तुतीस पात्र असणारी कामे इत्यादी नमूद आहे. सदर शासन निर्णयानुसार पोलीस अधीक्षक यांना रु.३५,०००/- व परिक्षेत्रिय विशेष पोलीस महानिरीक्षक यांना रु.७०,०००/- इतक्या आर्थिक मर्यादेपर्यंतचे बक्षिस मंजूर करण्याचे अधिकार आहेत. त्याप्रमाणे सदर बक्षिसा समवेत किंवा बक्षिसांच्या रक्कमेशिवाय जीएस्टी मंजूर करण्याचे अधिकार हे शासन निर्णयात नमुद केलेल्या अधिकाऱ्यांना आहेत. त्यानुसार कार्यवाही होणे अपेक्षित असल्याने, **सदरचा मुद्दा निकाली काढण्यात यावा.**	चांगली कामगिरी करणाऱ्यांना बक्षिस देण्याबाबत निर्देश दिले. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२२	**मुद्दा क्र. २२** श्री. दिक्षीतकुमार गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग **वि.पो.म.नि., का. व सु.** **उ.स., गुन्हे** **का.क्र. २१**	या घटकातील पोलीस कर्मचारी यांना मा. न्यायाधिशांचे (त्यांच्या घराचे) संरक्षण गार्ड म्हणून नवीन कर्तव्य आलेले असून मा. न्यायाधिश हे खाजगी निवासस्थानात रहातात. तरी अशा खाजगी ठिकाणी जागेचा अभाव असतो, अशावेळी कर्मचारी यांनी कर्तव्य कसे पार पाडावे, याबाबत चर्चा व्हावी.	सदर मुद्दयांच्या अनुषंगाने चर्चे अंती निर्णय घेण्यात येईल.	सदरचा मुद्दा हा संरक्षण विषय असल्याने, या मुद्यावर स्वतंत्रपणे वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल येईल असे निर्देश मुद्दा निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२३	**मुद्दा क्र.२३** श्रीमती सानिका उन्मेश गोंडाबे, मपोशि/०६-०३११, बृहन्मुंबई **वि.पो.म.नि., प्रशासन व.उ.स., नि. वे. का. क्र.२८.**	**महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये बदल होणेबाबत :-** महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या कार्यपध्दतीमध्ये बदल करण्यात यावा. तातडीची बाब म्हणून पोलीस अधिकारी / अंमलदार यांना पॅनलवरील हॉस्पीटल तसेच इतर हॉस्पीटलमध्ये दाखल होण्यासाठी डेबिटकार्ड सारखे कार्ड देण्यात यावे. जेणेकरुन पोलीस अधिकारी / अंमलदार यांना हॉस्पीटलमध्ये दाखल होण्यासाठी त्रास होणार नाही. पोलीस अधिकारी / अंमलदार यांना हॉस्पीटलमध्ये दाखल होतांना ते ज्या ठिकाणी कार्यरत आहेत. त्या कार्यालयाच्या वरिष्ठांच्या सही शिक्याचे पत्र आणावे लागते. पोलीस अधिकारी / अंमलदार स्वत: रुग्ण असतील, तर त्यांच्या नातेवाईकांची धावपळ होते. तसेच मेडीकल असिस्टन्स् यांची त्वरीत मान्यता मिळाली नाही. तर पोलीस अधिकारी / अंमलदार यांना नाहक अनामत रक्कम भरावी लागते व सदरची रक्कम परत मिळण्याकरीता खुप कालावधी लागतो.	**कार्यासन क्रमांक २८ :-** महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोगय योजनेची ओळखपत्रे त्रयस्थ पक्ष प्रशासक यांनी देण्यात यावीत, त्याबाबतचा खर्च त्रयस्थ पक्ष प्रशासक यांनी भागविण्यात यावा, अशी तरतूद विहीत केली आहे. परंतु, ओळखपत्रें डेबिटकार्ड सारखी देण्यात यावीत की कशाप्रकारे देण्यात यावी याबाबत स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले नाही. तसेच, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत उपचाराकरीता पॅनेलवरील रुग्णालयात दाखल होतांना संबंधीत घटक कार्यालयाचे फक्त सभासद पडताळणी पत्र आवश्यक आहे. कारण सेवानिवृत्त किंवा बडतर्फ झालेल्या तसेच, ज्यांची एक वर्षापेक्षा अधिक सेवा झालेली नाही अशा अधिकारी / अंमलदार यांना तसेच त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबातील व्यक्ती (निवृत्ती वेतन घेणारे व २५ वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या मुलांना वगळून) यांना महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजना लागू नाही. सदरहू योजनेचा दुरुपयोग होऊ नये यास्तव संबंधीत घटक प्रमुखांचे फक्त सभासद पडताळणी पत्र आवश्यक आहे. पोलीस अधिकारी / अंमलदार स्वत: रुग्ण असतील तरी त्यांच्या नातेवाईकांची फक्त सभासद पडताळणी पत्र घेण्याकरीता खूप धावपळ होणार नाही. महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत त्रयस्थ पक्ष प्रशासक यांचेकडून लाभार्थींना साधी ओळखपत्रें दिली जातात. लाभार्थींना डेबिटकार्ड सारखी ओळखपत्रें देण्यासंदर्भात व त्याच्या खर्चासंदर्भात कर्मचारी वृंद परिषदेमध्ये विचारविनिमय होणे आवश्यक आहे.	सदर मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२४	**मुद्दा क्र.२४** श्रीमती सानिका उन्मेश गोडांबे, मपोशि/०६-०३११, बृहन्मुंबई **वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०**	**७ व्या वेतन आयोगानुसार पोलीस नाईक पदास विशेष वेतन मंजूर होणेबाबत :-** दि.१/१/२०१९ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रामधील मुद्दा क्र.८ नुसार "पोलीस शिपाई, पोलीस नाईक आणि हवालदार या संवर्गाशी निगडीत कर्तव्याचे स्वरुप विचारात घेऊन त्या संवर्गाचे विद्यमान रु.५००/- दराने मिळत असलेले विशेष वेतन पुढे चालू ठेवण्यात आले होते. सदर विशेष वेतनात ५० टक्के वाढ करुन ते यापुढे देखील सुरु ठेवण्याची समितीने शिफारस केली आहे." व शसनाने शिफारस स्विकृत केली आहे.	सदर मुद्याबाबत सादर करण्यात येते की, शासन वेतन त्रुटी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.	पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडून शासनास पाठविण्यात आलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यात यावा. व पोलीस महासंचालक कार्यालयाकडून प्रस्ताव पाठविण्यात यावा.

५१ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीसाठी
सभासद नसलेले अधिकारी / कर्मचऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२५	**मुद्दा क्र. २५** पोलीस उप आयुक्त, दहशतवाद विरोधी पथक, मुंबई **वि.पो.म.नि.,प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०**	दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदारांकरीता लागू असलेल्या उत्तेजनार्थ योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतन + महागाई भत्त्याच्या ५०% जादा वेतन मिळणेबाबतच्या सदर प्रस्तावानुसार पोलीस महासंचालक कार्यालयाकडून शासनाकडे पाठपुरावा करण्यात यावा.	**कार्यासन क्रमांक ३०** :- दहशतवाद विरोधी पथकातील अधिकारी व अंमलदारांकरिता लागू असलेल्या उत्तेजनार्थ योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतन + महागाई भत्त्याच्या ५०% जादा वेतन मिळणेबाबत शासनास प्रस्ताव सादर करण्यात आला असून पाठपुरावा करण्यात येत आहे.	सदर प्रकरणी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा. व या प्रकरणी मा. अध्यक्षांना पुर्ण माहिती द्यावी.
२६	**मुद्दा क्र. २६** पोलीस आयुक्त, अमरावती शहर **वि.पो.म.नि., प्रशासन व.उ.स., नि. वे. का. क्र.२८.**	कुंटूंब आरोग्य योजनेअंतर्गत पॅनलवर अमरावती आयुक्तालयाचे आस्थापनेवर बालरोगतज्ञ यांचे रुग्णालय नाही, तरी त्याबाबत विचार करण्यात यावा	**कार्यासन क्रमांक २८** :- महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेतंर्गत अमरावती जिल्ह्यात सध्या ७ रुग्णालये आहेत. महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेंच्या पॅनेलवर घेण्याबाबत पारिजात हॉस्पिटल, अमरावती (बालरोग तज्ञ) यांचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाला असून, या कार्यालयाचे दि.६/५/२०१९ अन्वये पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचेकडून अभिप्राय व आवश्यक ती माहिती (जोडपत्र 'क') मागविण्यात आली आहे. तसेच, त्रयस्थ पक्ष प्रशासक यांना सदरहू रुग्णालयास प्रत्यक्ष भेट देऊन रुग्णालयात आवश्यक त्या सोई-सुविधा उपलब्ध आहे किंवा कसे, याबाबत तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल मागविण्यात आलेला आहे. महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनेलवर नव्याने रुग्णालयें घेण्याकरीता लवकरच समितीची बैठक आयोजित करण्यात येणार आहे. सदर बैठकीत पारिजात हॉस्पिटल, अमरावती (बालरोग तज्ञ) यांचा प्रस्ताव समिती समोर निर्णयाकरीता ठेवण्यात येत आहे.	दि.१८/६/२०१९ रोजी महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजनेच्या पॅनलवर नव्याने रुग्णालये घेण्याकरीता समितीची बैठक आयोजित करण्याचे आदेश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२७	**मुद्दा क्र. २७** समादेशक, रारापोबल, गट क्र. १४, औरंगाबाद **अ.पो.म.सं. रारापोबल, महाराष्ट्र राज्य, मुंबई** **अ.पो.म.सं., नि. व स., वि.पो.म.नि., प्रशासन उ.स., र. व का.** **का.क्र. १९-अ / १७**	**महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील राज्य राखीव पोलीस बलाच्या कार्यकारी कंपन्यांना बंदोबस्ताकरीता स्लीपर बसेस उपलब्ध होऊन मिळण्याबाबत.** रारापोबलातील कार्यकारी कंपन्या आंतर राज्य/इतर राज्य फिक्स पॉईंट बंदोबस्त तसेच नक्षल बंदोबस्ताकरीता वारंवार विविध ठिकाणी जातात. बंदोबस्तास जातांना प्रवास जास्त अंतराचा असल्यानंतर उपलब्ध असलेल्या बसेसमध्ये दैनदिन उपयोगाकरीता आवश्यक असलेले साहित्य ठेवण्याकरीता जागा अपुरी पडत असल्याने, कर्मचारी यांना बसण्याच्या सिटवर ठेवावे लागते. कॅरीअर उपलब्ध केल्यानंतरही पावसाळ्याच्या दिवसांमध्ये साहित्य पावसाच्या पाण्याने खराब होते. तसेच बंदोबस्तास गेल्यानंतर रहाण्याची सोय चांगल्याप्रकारे उपलब्ध होत नाही. बंदोबस्ताच्या ठिकाणी रहाण्याची जागा उपलब्ध नसल्यास स्लीपर बसेसमध्ये एक ते दोन दिवसांपुरते राहू शकतील. व प्रवासामध्ये त्रास होणार नाही. व बंदोबस्त चांगल्याप्रकारे पार पाडु शकतील. लोकसभा निवडणुक-२०१९ बंदोबस्तादरम्यान रारापोबल, गट क्र.१५, गोंदिया येथील कंपनीचे गोंदिया येथून अचानक झालेल्या संचारामुळे रहाण्याची व नैसर्गिक विधीकरीता अडचणी निर्माण झाल्या होत्या. त्यामुळे जवानांचे गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. यासंदर्भात रारापोबल, गट क्र.१४, औरंगाबाद या गटाचे मार्फतीने एकूण १८ स्लीपर बसेस मिळणेबाबत अपोमसं, रारापोबल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील पत्र क्र.अपोमसं/रारापोबल/०२/वाहन मंजूरी/गट-१४/०५/२०१७, दि.१७/१०/२०१८ व गट क्र.१४, औरंगाबाद यांचे पत्र क्र.सीबी-२/भाराब/गट क्र.१४/स्लीपरबसेस/१८/ मागणी२०१८/ ७९४३, दि.२२/९/२०१८ अन्वये मा. पो.म.सं., महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयास सादर केला आहे. रारापोबलातील क्र. १ ते १६ मधील सर्व कंपन्यांना तशाच प्रकारच्या प्रत्येक कंपनीकरीता सर्व सोयीयुक्त एकूण ४ स्लीपर बसेस उपलब्ध झाल्यास रारापोबलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे मनोबल उंचावुन ते बंदोबसतातील कर्तव्य उत्कृष्ट प्रकारे बजावतील.	**अ.पो.म.सं. रारापोबल, महाराष्ट्र राज्य, मुंबई :-** सदर मुद्दयांस अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सहमती दर्शविलेली आहे. **कार्यासन क्रमांक १९-अ :-** राज्य पोलीस दलाकरीता वार्षिक योजना / आधुनिकीकरण योजना किंवा अन्य योजनेअंतर्गत बस वाहन खरेदी करताना समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१४, औरंगाबाद यांनी मागणी केलेल्या स्लीपर बस खरेदी करण्यास विचार करण्याबाबत कार्यासन क्र. १७ यांना दि.७/६/२०१९ अन्वये कळविले आहे.	चांगल्या प्रकारची बस पुरविण्याबाबत कार्यवाही सुरु असल्याने, मुद्दा निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२८	**मुद्दा क्र. २८** पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण **वि.पो.म.नि., आस्था उ.स.,आस्था.-२ का.क्र. ५**	पोलीस दलामध्ये पोलीस शिपाई या पदावर पोलीस कर्मचारी भरती झाल्यानंतर इतर खात्याप्रमाणे तो कमीत कमी वर्ग-२ अधिकारी म्हणून सेवानिवृत्त व्हावा त्याकरीता एम.पी.एस.सी. मार्फत डायरेक्ट पोलीस उप निरीक्षक पदाची निवड न करता खत्याअंतर्गत परीक्षा मार्फत कर्मचारी निवडण्यात यावा जेणेकरुन पोलीस खात्याला त्याचा मागील सेवेचा अनुभव कामी येईल व शासनाचा इतर खर्च वाचेल.	**कार्यासन क्रमांक ५ :-** महाराष्ट्र पोलीस दलातील शासन निर्णय गृह विभाग क्र. पीएसबी-३९०/ सीआर ४०८/ पोल-५(अ), दि. ०५/०७/१९९४ अन्वये (१) महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (मुख्य) सरळसेवा भरती ५०% (२) विभागअंतर्गत उमेदवारांची परिक्षा घेऊन सरळसेवा भरती २५% व (३) पोलीस बलात रुजू झाल्यापासून १० वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झालेली आहे. त्यांची खात्यामार्फत पात्रता परिक्षा घेऊन पदोन्नतीने २५% अशा तीन प्रकारात पोलीस उप निरीक्षकांची पदे भरण्यात येतात. विभागीय पदोन्नतीने भरावयाची एकुण २४२२ पदे मंजूर आहेत. सेवानिवृत्तीने, पदोन्नतीने किंवा अन्य कारणाने रिक्त होणाऱ्या पदांवर टप्प्या टप्प्याने पोलीस उप निरीक्षक पदावर पदोन्नती दिली जाते.	अपर पोमसं, का. व सु., / लोहमार्ग / रारापोबल / प्रशिक्षण व खास पथके, विपोमनि, आस्थापना / सह पोलीस आयुक्त, प्रशासन, बृहन्मुंबई यांची कमिटी तयार करावी. व कमिटीने १५ दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२९	**मुद्दा क्र. २९** पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण **वि.पो.म.नि., आस्था उप सहा., गोपनीय का.क्र. ९**	पोलीस दलात देण्यात येणारे सन्मानचिन्ह हे महत्वपुर्ण कामगिरी करणारे कर्मचारी यांना न देता जास्तीत जास्त कार्यालयामध्ये व इतर शाखेमधील कर्मचारी प्रदिर्घ कालावधीत एकाच ठिकाणी नोकरी करणारे कर्मचारी यांना देण्यात येते असल्याचे स्पष्ट निदर्शनास येते. कार्यालयीन कर्मचारी यांचा जनतेशी काहीही संबंध येत नसल्याने त्यांचा सेवापट सहाजिकच चांगलो राहतो या उलट प्रत्यक्षात जनतेमध्ये काम करणारे कर्मचारी प्रती तक्रारी आल्याने सेवापटामध्ये एकजरी प्रतीकुल शेरा नोंदविला तरी त्यांचा संपूर्ण कालावधीच्या कामगिरीवर प्रश्नचिन्ह निर्माण होतो. सन्मानचिन्हाकरीता असलेल्या निष्कर्षामध्ये बदल होणे गरजेचे आहे. वास्तविक पाहता पोलीस दलाचा मुळ उद्देश कायदा व सुव्यवस्था तसेच तपास हा असताना सुध्दा जनतेमध्ये प्रत्यक्षरित्या काम करणारे कर्मचारी यांना पोलीस सन्मान चिन्ह देण्यात येत नसल्याचे दिसून येते. पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना सन्मान चिन्ह सोबत एक वेतनवाढ किंवा रोख रक्कम देण्यात यावी.	**कार्यासन क्रमांक ९ :-**मा पोलीस महासंचालक यांच्या सन्मानचिन्ह मंजुरीसाठीच्या सर्व शिफारशी या कार्यालयाच्या निवड समितीसमोर ठेवण्यात येतात. मा पोलीस महासंचालक यांचे सन्मानचिन्ह मंजुर करणा-या निवड समितीमध्ये या कार्यालयातील वरिष्ठ पोलीस अधिकारी पोलीस घटकांकडुन प्राप्त झालेल्या संबंधित सर्व शिफारशींची कठोर छाननी करतात व त्यातील सर्वोत्कृष्ट पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची मा पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह प्रदान करण्याकरिता निवड करतात. हे खरे आहे की सदरहु निवड करताना त्यांचे गोपनीय अहवाल (सेवापट) पाहिले जातात, परंतु त्याच बरोबर त्यांचे पोलीस दलातील कामकाज, त्यांनी सेवाकालावधीत केलेली वैशिष्ठयपुर्ण कामे, त्यांचा सेवाभिलेख, चारित्र्य इत्यादी सर्व बाबींची कठोरपणे पडताळणी केली जाते. एखादया अधिकारी/ कर्मचा-यास जरी कमी दर्जाचा शेरा असला तरीही त्यांचा संपुर्ण सेवाभिलेख व त्यांनी केलेली कामे पाहुन त्यांना मा पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह मंजुर करण्यात येते. मा पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह मंजुर करताना ते ११ वेगवेगळया संवर्गामध्ये वर्गीकरण करुन प्रदान करण्यात येते. त्यात १५ वर्षात उत्कृष्ट सेवाभिलेख ठेवण्याबरोबरच उत्कृष्ट तपासकाम व गुन्हे शाबिती, पोलीस दलासाठी नाविन्यपुर्ण कल्पना राबविणे, खेळातील राष्ट्रीय स्तरावरील प्राविण्य, २० वर्षाच्या सेवेत एकही अपघात न करणा-या पोलीस चालक, विशेष शाखेत प्रदीर्घ कालावधीसाठी कर्तव्य, नक्षलग्रस्त भागातील अधिकारी	घटक प्रमुखांकडून आलेल्या प्रस्तावावर योग्य ती छाननी करुन कमिटीमध्ये निर्णय घेण्यात येतो. त्याप्रमाणे सन्मानचिन्ह दिली जातात. जे निकष आहेत ते बरोबर आहेत. सध्या कोणत्याही प्रकारच्या निकषामध्ये बदल करण्याची गरज नाही. वि.पो.म.नि. आस्थापना, यांनी कशाप्रकारे सन्मानचिन्हे देण्यात येते त्याची माहिती mahapolice या वेबसाईटवर प्रसारित करण्याचे निर्देश दिले. अस्तित्वात असलेली तरतूद योग्य असल्याचे पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रामीण यांना पोलीस महासंचालक यांच्या स्वाक्षरीचे पत्राने कळविण्याबाबत

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
२९			व कर्मचारी व इतर तसेच ज्यांचे राष्ट्रपती पोलीस पदकाकरिता शासनास प्रस्ताव पाठविण्यात येतात परंतु केंद्र शासनाकडुन अमान्य करण्यात येतात त्यांना सदरचे सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येते. शासनाने सन २०१८ पासुन ८०० मा पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह मंजुर करण्याबाबत शासन आदेश दिले आहेत. त्यामुळे उपरोक्त सर्व बाबी विचारात घेता पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सन्मानचिन्ह देता येणे शक्य झालेले आहे व कोणीही अधिकारी व कर्मचारी या सन्मानचिन्हापासुन वंचित राहिलेला नाही. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पदक (DG Insignia) प्राप्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना १ वाढीव वेतनवाढ देण्याबाबत तसेच रु ५०,०००/- किंवा त्यावरील रोख रक्कम स्वरुपात बक्षिस देण्याबाबत शासनास प्रस्तावित करण्यात आले असुन वेळोवेळी शासनास स्मरणपत्र पाठविण्यात आली आहेत. सन्मानचिन्हे धारकांना आगाऊ वेतनवाढ देण्याच्या दृष्टीने निकष निश्चित करुन शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबतची तजवीज ठेवली आहे.	विपोमनि, आस्थाना निर्देश दिले. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
३०	**मुद्दा क्र. ३०** पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे **अपर पोमसं, लोहमार्ग, मुंबई**	पुणे लोहमार्ग जिल्ह्यात संवदेनशील रेल्वे स्टेशन उदा. जिंती, पारेवाडी, पोफळज, ढवळज इ. असून अशा रेल्वे स्टेशन हद्दीत होम सिग्नल, आउटर सिग्नल येथे सशस्त्र पोलीस कर्मचारी यांची फिक्स पॉईन्ट म्हणून नेमणूक केली जाते. सदर ठिकाणी पोलीस कर्मचारी यांचे निवाऱ्यासाठी कोणतीही व्यवस्था नसते. सदर ठिकाणी विद्युत व्यवस्थेसह निवारा/शेड उभारणे हे रेल्वे प्रशासनाच्या अखत्यारितील असल्याने, ऊन, वारा व पाऊस या पासून बचाव होईल असा निवारा/शेड बांधून मिळणेबाबत रेल्वे प्रशासनास लिहून जाणे आवश्यक आहे.	अपर पोमसं, लोहमार्ग, मुंबई यांचेकडून कार्यवाही सुरु आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.
३१	**मुद्दा क्र. ३१** पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे **अपर पोमसं, लोहमार्ग, मुंबई**	पुणे लोहमार्ग जिल्ह्यातील रेल्वे पोलीसांना रेल्वे ड्युटीकार्ड पासची सेवा रेल्वे प्रशासनाकडून उपलब्ध करुन दिली आहे. सदरचे रेल्वे पास हे प्रत्येक वर्षी मुदत वाढवून मिळतात. सदर रेल्वे पासची मुदत वाढविण्यासाठी माहे सप्टेंबर मध्ये जमा केले जातात. परंतु रेल्वे प्रशासनाकडून रेल्वे पास मुदत वाढवून १ किंवा २ महिन्याने परत मिळतात. त्यामुळे रेल्वेतून कर्तव्यार्थ प्रवास करताना अडचणी निर्माण होतात. तरी सदरचे रेल्वे ड्युटीपास हे तीन वर्षातून एकदा नुतनीकरण करणे उचित होईल.	अपर पोमसं, लोहमार्ग, मुंबई यांचेकडून कार्यवाही सुरु आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
३२	**मुद्दा क्र. ३२** पोलीस अधीक्षक, लोहमार्ग, पुणे **वि.पो.म.नि., प्रशासन** **व.उ.स., नि. वे.** **का. क्र. ३९**	महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारीत असल्यास, महाराष्ट्र पोलीसांनाही सेवानिवृत्तीनंतर वन रॅक वन पेन्शन मिळणे गरजेचे आहे. जेणेकरुन सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शनमधील तफावती दूर होतील.	**कार्यासन क्रमांक ३९ :-**दि.१/११/२०१५ पूर्वी जे अधिकारी/कर्मचारी शासन सेवेत नियुक्त झालेले आहेत. त्यांना सेवानिवृत्तीनंतर महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्तीवेतन], नियम १९८२ नुसार सेवानिवृत्ती वेतन देण्यात येते. तसेच, राज्य शासनाच्या सेवेत दि.१/११/२००५ नंतर ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली आहे. त्यांना नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे वन रँक वन पेन्शन ही योजना महाराष्ट्र राज्यात चालू नाही. तथापि, या संदर्भात माहिती प्राप्त करुन वन रँक वन पेन्शन ही योजना फायदेशीर आहे किंवा नाही याची तुलनात्मक तपासणी करण्यात येईल. तुर्तास सदरचा मुद्दा निकाली काढण्याबाबत दि.२७/५/२०१९ च्या ज्ञापान्वये कळविले आहे.	मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव</th><th>सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.</th><th>कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय</th><th>मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश</th></tr>
<tr><td>३३</td><td><u>मुद्दा क्र. ३३</u>

प्राचार्य,
पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर

वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०</td><td>प्रतिनियुक्ती कालावधीत ३०% वेतनवाढ ऐवजी १ टप्पा पदोन्नती देण्यात यावी.</td><td><u>कार्यासन क्रमांक ३० :-</u> शासन निर्णय गृहविभाग क्र. पोलीस १८१५/ प्र.क्र.५४/पोल-५ अ, दिनांक. ०९/११/२०१५ अन्वये प्रायोगीक तत्वावर मंजूर करण्यात आलेला एक टप्पा पदोन्नतीबाबतचा दि.२०/११/१९९९ शासन निर्णय रद्द करुन राज्याच्या नविन प्रशिक्षण धोरणानुसार प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षकांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने कर्मचारी नेमणुकीवर /प्रतिनियुक्तीवर कार्यरत असेपर्यंत ३०% प्रशिक्षण भत्ता (मुळ वेतन+ग्रेड वेतन यावर देण्यात येतो.)
उपरोक्त मुद्दयानुसार ६ व्या वेतन आयोगात पोलीस हवालदार पदाचे वेतन ५२००-२०२०० या वेतन श्रेणीत प्रशिक्षक कालावधीत पुढील प्रमाणे होईल.
(नागपूर प्रशिक्षण केंद्र)
<table>
<tr><th>३०% प्रोत्साहन भत्ता देऊन</th><th>एक टप्पा पदोन्नती देऊन</th></tr>
<tr><td>वेतन - ७,७००/-</td><td>वेतन - ८,०००/-</td></tr>
<tr><td>महागाई भत्ता - १०,७०३/-</td><td>महागाई भत्ता - १११२०/-</td></tr>
<tr><td>घरभाडे भत्ता - ११,५५/-</td><td>घरभाडे भत्ता - १,२००/--</td></tr>
<tr><td>प्रोत्साहन भत्ता - २,३१०/-</td><td>---</td></tr>
<tr><td>एकुण - २३,८६८/- + इतर भत्ते</td><td>एकुण- २०,३२०/- + इतर भत्ते</td></tr>
</table>
दि. ०९/११/२०१५ च्या शासन निर्णयानुसार अन्वये एकटप्पा पदोन्नतीपेक्षा ३०% प्रोत्साहन भत्ता देऊन प्रशिक्षक कर्मचाऱ्यांना एक टप्पा पदोन्नतीपेक्षा जादा वेतन मिळते. तरी सदर मुद्दयाबाबत तपशिलवार स्पष्टीकरण सादर केल्यास याबाबत बैठकीत विचार विनिमय करुन निर्णय घेणे उचित होईल.</td><td>मुद्दा निकाली काढण्यात यावा, व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, नागपूर यांना ३०% प्रशिक्षण भत्ता ही पध्दत योग्य असल्याचे पत्रान्वये कळवावे.</td></tr>
</table>

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
३४	**मुद्दा क्र.३४** पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण **वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०**	७ व्या वेतन आयोगामध्ये पोलीस निरीक्षक यांचे वेतन तहसिलदार, सहायक पोलीस निरीक्षक यांचे वेतन नायब तहसिलदार, पोलीस उप निरीक्षक यांचे वेतन पेशकार, पोलीस हवालदार यांचे वेतन मंडळ अधिकारी यांच्या बरोबरीने असावा अशा प्रकारे महसुल विभागाच्या वेतनश्रेणी असावी अशी मागणी होती. त्याची दखल ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे घेण्यात आलेली नाही.	**कार्यासन क्रमांक ३० :-** कार्यालयाचा प्रस्ताव क्र.पोमसं/३०/३३/वेतन पुर्नरचना शिफारसी/७ वा वेतन आयोग/१७३/२०१७ दि.१७/०२/२०१८ अन्वये करण्यात आली होती. त्याची दखल ७ वा वेतन आयोग समितीने घेतलेली नाही.वेतन त्रुटी समितीकडे फेर प्रस्ताव सादर करणे उचित होईल.	प्रस्ताव सादर करावा.
३५	**मुद्दा क्र.३५** पोलीस अधीक्षक, औरंगाबाद ग्रामीण **वि.पो.म.नि., प्रशासन उप सहा., लेखा का.क्र. ३०**	६ व्या वेतन आयोगाप्रमाणे पोलीस नाईक यांना रु.४८०/- विशेष वेतन भत्ता देय होता. आता ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे उडविण्यात आलेला आहे. तरी तो रु.४८०/- वरुन रु.९८०/- करण्यात यावा अशी पोलीस कर्मचारी यांची विनंती आहे.	**कार्यासन क्रमांक ३० :-** ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे पोलीस नाईक यांना रु.४८०/-विशेष वेतन भत्ता देय होता. आता ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे देण्यात आलेला नाही. पोलीस शिपाई व पोलीस हवालदार यांना ५०० ऐवजी ७ व्या वेतन आयोगात रु. ७५०/- प्रमाणे विशेष भत्ता मंजुर केलेला आहे. परंतु पो.नाईक या पदाला मिळणारा विशेष वेतन भत्ता पुर्णत: वगळण्यात आलेला आहे. याबाबत वेतन त्रुटी समितीकडे पोलीस नाईक पदाला पो.ह. व पो.शि. यांचे प्रमाणे रु.७५०/- प्रमाणे विशेष वेतन मिळण्याबाबत, बैठकीत निर्णय झाल्यास, समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल.	शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
३६	**मुद्दा क्र. ३६** पोलीस अधीक्षक, नांदेड **वि.पो.म.नि., प्रशासन व.उ.स., नि. वे. का.क्र. २८**	Cellullis due to Diabeties यामुळे नंतर होणारे गँगरीन व Mully Organ Failuer या आजाराची ट्रिटमेंट दिर्घ मुदतीची व खर्चिक असल्याने, ती कर्मचाऱ्यांना परवडत नाही. तरी हा आजार पोलीस कुटूंब आरोग्य योजनेतंर्गत समाविष्ठ करावा.	**कार्यासन क्रमांक २८ :-** शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्र. एम्.ए.जी.२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दि.१९/३/२००५ अन्वये निश्चित केलेल्या २७ आकस्मिक, व ५ गंभीर आजारांवर शासन निर्णय, गृह विभाग, क्र. पीडब्ल्यू एफ्-१२०४/१४३/ प्र.क्र.२ /भाग-३/पोल-७, दि. २८/०७/२००६ अन्वये महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत आंतररुग्णालयीन औषधोपचार विनामूल्य अनुज्ञेय आहेत. डायबेटीस किंवा त्यामुळे होणारे Cellulitis, गँगरीन व Multy Organ Failure हे आजार शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, दि.१९/०५/२००५ च्या आजारांमध्ये समाविष्ठ होत नसल्याने, महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत त्यांचा समावेश होत नाही. खालील आजार महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेंतर्गत समाविष्ट होण्याबाबत शासनास दि. २४/०२/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर करण्यात आला असून, त्यामध्ये डायबेटीस किंवा त्यामुळे होणारे Cellulitis, गँगरीन व Multy Organ Failure हे आजार समाविष्ट करण्यात आलेला नाही:- (1) Hysterectomy surgery, (2) High grade fever (Dengue, Leptospirosis, Chikungunia, Malaria only if hospitalilsaion is required) (3) PID related surgeries (4) Liver diseases (5) Implant / Removal / Secondary surgeries related to earlier admission तरी, डायबेटीस किंवा त्यामुळे होणारे आजार महाराष्ट्र पोलीस कुटुंब आरोग्य योजनेमध्ये समावेश करण्याकरीता कर्मचारी वृंद परिषदेमध्ये चर्चामध्ये ठेवण्यात यावा. कर्मचारी वृंद परिषदेमध्ये मान्यता मिळाल्यास शासनास प्रस्ताव सादर करण्यात येईल.	सदरचा आजार समाविष्ट करण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्याबाबत निर्देश दिले.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी उपस्थित केलेले मुद्दे.	कार्यासनाचे सद्यस्थितीचे अभिप्राय	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
३७	**मुद्दा क्र. ३७** श्री. दिक्षीतकुमार गेडाम, पोलीस अधीक्षक, सिंधुदुर्ग **वि.पो.म.नि., प्रशासन** **उप सहा., लेखा** **का.क्र. ३०**	शिवशाही व शिवनेरी अशा आराम एसटी बसमध्ये वाँरट वापरण्यास परवानगी नसल्याने, अधिकारी / कर्मचाऱ्यांना प्रवास करणे अडचणीचे होते. सदर बसमध्ये एसटी वाँरट वापरण्यास परवानगी देण्यात यावी.	**कार्यासन क्रमांक ३० :-** सदर मुद्याबाबत सादर करण्यात येते की, राज्यातील पोलीस अधिकारी / कर्मचाऱ्यांना सरकारी कामासाठी शिवशाही व शिवनेरी अशा आराम एसटी बसमध्ये तात्काळ वाँरटची सुविधा मिळण्याबाबत दि.१४/०५/२०१९ च्या पत्रान्वये राज्य परिवहन महामंडळ यांना सुचना देण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे.	राज्यातील ज्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या वेतनश्रेणीनुसार वाताणुकुलीत एसटी बस प्रवास अनुज्ञेय आहे. त्यांना एसटी वाँरटवर सदरचा प्रवास करता येतो. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

५१ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीसाठी
सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे.	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१	**मुद्दा क्र. १** श्री. राजेंद्र बापूराव जगताप, सहा. पोलीस उप निरीक्षक, पुणे शहर **अपर पो.म.सं., नि. व स.** **उप सहायक, पुनर्रचना** **कार्यासन क्र. २७.**	पोलीस वसाहती / पोलीस ठाणे यांची देखभाल / डागडुजी PWD विभागाकडून होते. त्याऐवजी पोलीस गृह निर्माण विभागाकडून केल्यास पारदर्शक व मजबुजीकरण होईल (तकलादू काम होणार नाही)	पोलीस वसाहती / पोलीस ठाणे यांची देखभाल / डागडुजी PWD विभागाकडून होते. असा निर्णय असल्यामुळे मुद्दा निकाली काढण्यात आला.
२	**मुद्दा क्र. २** श्री. राजेंद्र बापूराव जगताप, सहायक पोलीस उप निरीक्षक, पुणे शहर **अपर पो.म.सं., धोरण** **कार्यासन क्र. ४४.**	लेदर बुट उन्हाळ्यात गरम होते / पावसाळ्यात भिजतो. त्यामुळे आधुनिक (कमी वजनाचा) स्पोर्ट शुज बाबत विचार व्हावा.	अपर पोमसं, नि. व स. / रारापोबल यांनी चर्चा करुन याबाबत अभ्यास करावा व अहवाल सादर करावा.
३	**मुद्दा क्र. ३** श्री. राजेंद्र बापूराव जगताप, सहायक पोलीस उप निरीक्षक, पुणे शहर **विपोमनि, आस्थापना / प्रशासन** **कार्यासन क्र.३ (नोडल डेस्क) / ८**	अर्जित रजा ३०० दिवस असते. जास्त शिल्लक रजा वाया जाते. सेवानिवृत्तीच्यावेळी ६०० दिवस अर्जित रजा करावी.	केंद्र शासनाकडे सुध्दा ३०० दिवस रजा आहे. कोणत्याही फोर्समध्ये ६०० दिवसांपेक्षा रजा करण्याची तरतूद नाही. सदरचा मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे.	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
४	**मुद्दा क्र. ४** श्री. अनिल उत्तम काळे, पोहवा/१५५८, पुणे ग्रामीण **विपोमनि, आस्थापना** **कार्यासन क्र. ९**	पुणे जिल्हा परिषदेच्या ज्या शिक्षकांना जिल्हा परिषदेचा पुरस्कार मिळाल्यानंतर जादा वेतनवाढ चालू आहे. परंतु पोलीस खात्याची गेली १० वर्षापेक्षा जास्त दिवस झाले ज्या DG Insignia मिळाले. त्यांना वेतनवाढ झाली नाही.	शासनास प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे. पाठपुरावा करण्यात यावा.
५	**मुद्दा क्र. ५** श्री. पी. पी. खडपकर, राखीव पो. उप नि., रारापोबल, गट क्र.१, पुणे **विपोमनि, आस्थापना** **कार्यासन क्र. ३-अ**	राज्य राखीव पोलीस दलातील अधिकारी पदोन्नती जागा रिक्त असून सुध्दा वेळोवेळी भरली जात नाही. त्यामुळे अतिरिक्त ताण हा हजर असलेल्या अधिकाऱ्यांवर होतो. रजा भोगता येत नाही. व इतर कौटुंबिक कामांकडे दुर्लक्ष होते.	पदोन्नतीच्या जागा लवकरच भरण्याची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला
६	**मुद्दा क्र. ६** श्री. पी. पी. खडपकर, राखीव पो. उप नि., रारापोबल, गट क्र.१, पुणे **विपोमनि, आस्थापना / प्रशासन** **कार्यासन क्र.३ (नोडल डेस्क) / ८**	भरती झालेपासून ते सेवा कालावधी पुर्ण होईपर्यंत वार्षिक रजा प्रतिवर्ष ३० दिवस. **उदा. २० वर्ष सेवा X ३० (दिवस रजा) = ६००** परंतु ३०० वर रजा जात असल्यास पुढील सेवा चालू आहे. तरीही ३०० वर रजा जमा होत नाही. तर ३०० रजा होत असेल व रजा भोगल्या आहेत तर ३०० मधून वजा केली जाते. ३००-३०+२७०. म्हणजेच पुढे सलग (रजा भोगता आली नसल्यास) जमा होत नाही.	सेवानिवृत्ती पर्यंतच्या ३०० दिवसांची रजा धरण्यात येणार. त्यापेक्षा जास्त रजा असतील तर त्या रद्द होणार. रजेच्या तरतूदी संदर्भात स्पष्टता करण्याचे निर्देश दिले.
७	**मुद्दा क्र. ७** श्री. एस्. के. देशमुख, पोहवा/१६४, रारापोबल, गट क्र.५, दौंड **अपर पोमसं, रारापोबल, मुंबई** **विपोमनि, प्रशासन** **कार्यासन क्र. ३०**	राज्य राखीव पोलीस बलासाठी बंदोबस्ताच्या ठिकाणी रहाण्याची सोय चांगली व्हावी. राज्यात व राज्याबाहेर प्रवास भत्ता व इतर भत्त्यांमध्ये वाढ व्हावी. तसेच केंद्राप्रमाणे राशन भत्ता मिळावा	रहाण्याची सोय चांगल्याप्रकारची होण्याकरीता योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच प्रवास भत्त्याबाबतचा प्रस्ताव दि.३०/४/२०१९ अन्वये शासनास पाठविण्यात आलेला आहे.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे.	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
८	**मुद्दा क्र. ८** **श्रीमती स्मिता ढाकणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, ठाणे रेल्वे पोलीस ठाणे, लोहमार्ग, मुंबई.** **विपोमनि, प्रशासन** **कार्यासन क्र. ३०**	पोलीस अधिकारी यांचे वार्षिक गणवेश भत्त्यामधील तफावत दूर करण्याबाबत. **सद्य:स्थिती :-** पो.कॉ. ते सहायक पोलीस फौजदार या पोलीस कर्मचारी पदाकरीता शासनाकडून प्रत्येक वर्षातून एकादा रु.५,१६४/- गणवेष भत्ता अदा केला जातो. **तफावत :-** पोलीस उप निरीक्षक ते पोलीस उप आयुक्त या पदापर्यंत ४ वर्षातून एकदा रु.५,०००/- गणवेष भत्ता अदा केला जातो. **तरतूद :-** गणवेष भत्त्यामधील वरील नमूद वार्षिक तफावत दूर करुन पोलीस उप निरीक्षक ते पोलीस उप आयुक्त या पदापर्यंत या अधिकारी पदाचे वेतनाचे दरानुसार गणवेष भत्ता दरवर्षी देण्याची तरतूद करण्यात यावी.	गणवेष भत्त्याबाबतचा प्रस्ताव दि.१०/१/२०१९ अन्वये शासनास पाठविण्यात आलेला आहे. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला
९	**मुद्दा क्र. ९** श्री. प्रशांत देविदास गिते, सहायक पोलीस निरीक्षक, यवतमाळ **अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई**	सेवा अंतर्गत प्रशिक्षण बाबत माहिती किमान १० दिवस अगोदर देण्यात यावी. महाराष्ट्र पोलीस दलामध्ये नाशिक, मुंबई, पुणे येथे पोलीस अधिकारी / कर्मचारी यांचेकरीता सेवाअंतर्गत प्रशिक्षण आयोजित करण्यात येतात. त्याबाबत प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना वेळेवर माहिती देण्यात येते त्यामुळे प्रवास रिझर्वेशन मिळत नसल्याने प्रवास सोईचा होत नाही. करीता प्रशिक्षणाबाबतची माहिती निवड झालेल्या अधिकारी / कर्मचारी यांना किमान १० दिवस अगोदर देण्यात यावी.	यापुढे प्रशिक्षणाबाबत वेळेत कळविण्याबाबत अपर पोमसं, प्रशिक्षण व खास पथके, मुंबई यांनी कळविण्याचे निर्देश दिले. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद असलेले अधिकारी / कर्मचाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेले मुद्दे.	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
१०	**मुद्दा क्र. १०** श्री. तानाजी पांडुरंग पाटील, पोलीस शिपाई ठाणे शहर **विपोमनि, प्रशासन** **कार्यासन क्र. ३०**	६ व्या वेतन आयोगाप्रमाणे धर्नजित रजा मिळतो तो ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे मिळण्याबाबत	वरिष्ठा अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये चर्चा करण्यात येईल. मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला

५१ व्या राज्य पोलीस कर्मचारी वृंद परिषदेच्या बैठकीसाठी
सभासद नसलेल्या अधिकाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेला मुद्दा.

अ. क्र.	मुद्दा क्रमांक व विषय सुचकाचे नांव / घटकाचे नांव	सभासद नसलेल्या अधिकाऱ्यांनी आयत्यावेळी उपस्थित केलेला मुद्दा	मा. अध्यक्षांचे आदेश / निर्देश
११	**मुद्दा क्र. १** श्री. अमोल खोंडे, पोलीस उप निरीक्षक, नाशिक शहर **विपोमनि, आस्थापना** **कार्यासन क्र. ३-अ**	गेल्या अडीच वर्षापासून पोलीस उप निरीक्षक ते सहायक पोलीस निरीक्षक पदोन्नती झालेल्या नाहीत. त्याबाबत पुढील कार्यवाही तात्काळ केल्यास पदोन्नती होऊन बदली होणाऱ्या अधिकाऱ्यांना त्यांच्या मुलांचे शाळांचे ॲडमिशन व फॅमिली शिफ्टींगबाबत अडचणींना सामोरे जावे लागणार नाही. तरी कृपया पोलीस उप निरीक्षक ते सहायक पोलीस निरीक्षक पदोन्नतीची प्रक्रिया लवकरात लवकर पुर्ण व्हावी.	दि.१५/७/२०१९ पर्यंत पदोन्नती आदेश काढण्याचे निर्देश दिले. **मुद्दा चर्चेअंती निकाली काढण्यात आला**